# प्राधिकृत आर्थिक कार्यचालक (एइओ) योजना

## --- वारंवार विचारले जाणारे प्रश्न ---

## प्राधिकृत आर्थिक कार्यचालक (ए इ ओ) योजना -

## वारंवार विचारले जाणारे प्रश्न

## ए इ ओ कार्यक्रमाची पार्श्वभूमी व वैशिष्ट्ये

**प्रश्न 1. प्राधिकृत आर्थिक कार्यचालक (एइओ) म्हणजे काय ?**

**उत्तर -** प्राधिकृत आर्थिक कार्यचालक संस्था ही, राष्ट्रीय सीमाशुल्क कायद्याच्या विवक्षित तरतुदींचे पालन करण्यासाठी जे आवश्यक आहे असे कोणतेही काम करताना, मालाची आंतरराष्ट्रीय ने-आण करण्यात सहभागी असलेली आणि जागतिक सीमाशुल्क संघटना करारांचे किंवा तत्सम पुरवठा साखळी सुरक्षा मानकांचे अनुपालन करणारी राष्ट्रीय सीमाशुल्क प्रशासनाद्वारे किंवा त्यांच्यावतीने मान्यता देण्यात आलेली एक व्यावसायिक संस्था आहे.

सुरक्षा मानके जागतिक सीमाशुल्क संघटनेच्या मानकांच्या सुरक्षा चौकटीत तपशिलवार दिली आहेत. भारतीय प्राधिकृत आर्थिक कार्यचालक कार्यक्रमाची मानके त्यावर आधारित आहेत.

**प्रश्न 2. प्राधिकृत आर्थिक कार्यचालक कार्यक्रम म्हणजे काय ?**

**उत्तर -** प्राधिकृत आर्थिक कार्यचालक कार्यक्रम हा, प्रामुख्याने व्यापार सुलभीकरण उपाययोजना असून त्यांना उच्च दर्जाच्या खात्रीशीर सुविधा पुरविण्याची हमी देण्याच्या दृष्टीने सुरक्षित व अनुपालनकारी व्यवसाय निश्चित करणे सीमाशुल्क प्रशासनास शक्य होते. हा विभाजित दृष्टिकोन, सीमाशुल्क नियंत्रणासाठी कमी अनुपालन करणास अथवा अनुपालन न करणास किंवा जोखमीच्या व्यवसायांवर लक्ष केंद्रीत करण्यास सीमाशुल्क संसाधनास मुभा देतो. विश्वसनीय कार्यचालकांना मान्यता देऊन त्याद्वारे आंतरराष्ट्रीय पुरवठा साखळी सुरक्षित करणे आणि आंतरराष्ट्रीय पुरवठा साखळीतील सर्व स्तरांवर सर्वोत्तम पद्धतीस उत्तेजन देणे हे प्राधिकृत आर्थिक कार्यचालक कार्यक्रमाचे ध्येय आहे. या कार्यक्रमामार्फत, सीमाशुल्क विभाग आपल्या जबाबदाऱ्या व्यवसायांबरोबर विभागून घेतो त्याचवेळी

त्यांना अनेक अतिरिक्त लाभ मिळवून देतो.

**प्रश्न 3. जागतिक सीमाशुल्क संघटनेच्या प्राधिकृत आर्थिक कार्यचालक योजनेची पार्श्वभूमी काय आहे?**

**उत्तर -** प्राधिकृत आर्थिक कार्यचालक योजना 11 सप्टेंबर, 2001 रोजी घडलेल्या अमेरिकेतील घटनेची निर्मिती असून त्यामुळे पुरवठा साखळीच दहशतवादी कारवायांसाठी वापरली जाऊ शकते याची सर्व सरकारांना जाणीव झाली आणि पुरवठा साखळी सुरक्षित ठेवण्याची गरज वाटली. पुरवठा साखळी व्यापाराद्वारे नियंत्रित केली जात असल्याने, पुरवठा साखळी सुरक्षित ठेवण्याच्या दृष्टीने सीमाशुल्क प्रशासन, व्यापारात सहभाग घेत आहे. अमेरिकेने सीटी-पीएटी (सीमाशुल्क व्यापार - दहशतवादाविरूद्ध भागीदारी) हा कार्यक्रम सुरू केला. त्यानंतर जागतिक सीमाशुल्क संघटनेने, व्यापार सुरक्षित व सुलभीकरणाच्या दृष्टीने, 2005 मध्ये मानकांची सुरक्षा चौकट स्वीकारली. या सुरक्षा चौकटीचे, सीमाशुल्क (विभाग) ते सीमाशुल्क (विभाग) यांच्यातील भागीदारी, सीमाशुल्क (विभाग) ते व्यवसाय यांच्यातील भागीदारी आणि सीमाशुल्क (विभाग) ते अन्य शासकीय हितसंबंधित यांचा समावेश असणारे तीन स्तंभ आहेत. प्राधिकृत आर्थिक कार्यचालक कार्यक्रम हा स्तंभ- दोनचा म्हणजेच सीमाशुल्क (विभाग) ते व्यवसाय यातील भागीदारीचा मुख्य गाभा आहे.

**प्रश्न 4. जागतिक सीमाशुल्क संघटनेच्या मानकांच्या सुरक्षा चौकटीची भारतात अंमलबजावणी कशी करण्यात येत आहे ?**

**उत्तर -** मानकांची सुरक्षा चौकट ही ज्या निकषांद्वारे पुरवठा साखळीतील व्यवसायांना एक सुरक्षित भागीदार म्हणून प्राधिकृत स्थिती मिळविता येऊ शकेल असे निकष ठरविते. हे निकष, सीमाशुल्क परिपत्रक क्रमांक 28/2012, दिनांक 16.11.2012 यामध्ये समाविष्ट केल्या आहेत. त्यानंतर परिपत्रक क्रमांक 03/2018, दिनांक 17.2.2018, 26/2018, दिनांक 10.8.2018 आणि परिपत्रक क्रमांक 51/2018, दिनांक 7.12.2018 याद्वारे सुधारणा केलेल्या परिपत्रक क्रमांक 33/2016-

सीमाशुल्क, दिनांक 22.7.2016 याद्वारे एक सुधारित प्राधिकृत, आर्थिक कार्यचालक कार्यक्रम सुरू करण्यात आला.

**प्रश्न 5. भारतातील प्राधिकृत आर्थिक कार्यचालक कार्यक्रमाचा इतिहास काय आहे ?**

**उत्तर -** सीमाशुल्क परिपत्रक क्रमांक 37/2011, दिनांक 23 ऑगस्ट, 2011 याद्वारे 2011 मध्ये प्राधिकृत आर्थिक कार्यचालक कार्यक्रम हा एक पथदर्शी प्रकल्प म्हणून सुरू केला होता. या कार्यक्रमात सुधारणा केली आणि परिपत्रक क्रमांक 28/2012, दिनांक 16.11.2012 याद्वारे अंतिम प्राधिकृत आर्थिक कार्यचालक कार्यक्रम सुरू करण्यात आला.

आंतरराष्ट्रीय व्यापार वृद्धि सुलभीकरण यांवर आधारित व्यापार सुलभीकरण करार (टीएफए) यांसारख्या आंतरराष्ट्रीय घडामोडी विचारात घेऊन भारत सरकारने व्यवसाय सुलभीकरणावर भर देऊन विद्यमान अधिस्वीकृत ग्राहक कार्यक्रम (एसीपी) व सुधारित प्राधिकृत आर्थिक कार्यचालक कार्यक्रमाच्या रूपातील सुधारित चालू प्राधिकृत आर्थिक कार्यचालक योजना, 2012 चे विलिनीकरण करून परिपत्रक क्रमांक 33/2016 सीमाशुल्क, दिनांक 22.7.2016 याद्वारे एक सर्वंकष, एकसंध व्यापार सुलभीकरण उपक्रम सुरू केला होता. अधिस्वीकृत ग्राहक कार्यक्रम ही योजना परिपत्रक क्रमांक 42/2005 सीमाशुल्क, दिनांक 24.11.2005 द्वारे रद्द करण्यात आली. परिपत्रक क्रमांक 03/2018, दिनांक 17.1.2018 या अन्वये प्राधिकृत आर्थिक कार्यचालक अर्ज प्रक्रियेची वित्तीय ऐपतदारी व विकेंद्रीकरण यांचे आणखी सुलभीकरण करण्यात आले. प्राधिकृत आर्थिक कार्यचालक टी-1 अभिस्वीकृती अर्जाची प्रक्रिया, परिपत्रक क्रमांक 33/2016, दिनांक 22.7.2016 मध्ये करारनिविष्ट केलेल्या पाच जोडपत्रांवरून परिपत्रक क्रमांक 26/2018, दिनांक 10.8.2018 अन्वये केवळ दोन जोडपत्रांच्या रूपात करून आणखी सोपी करण्यात आली. परिपत्रक क्रमांक 51/2018, दिनांक 7.12.2018 अन्वये डिसेंबर 2018 पासून प्राधिकृत आर्थिक कार्यचालक टी-1 करिता ऑनलाईन अर्ज सादर करण्यास व त्यावरील प्रक्रियेस सुरूवात करण्यात आली.

**प्रश्न 6.** **भारतीय सीमाशुल्क विभागाच्या प्राधिकृत आर्थिक कार्यचालक कार्यक्रमाचे ध्येय काय आहे ?**

**उत्तर -** प्राधिकृत आर्थिक कार्यचालक कार्यक्रमाची उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे आहेत :-

- आंतरराष्ट्रीयदृष्ट्या मान्यताप्राप्त प्रमाणपत्रांसह व्यवसाय संस्थांची तरतूद करणे;
- व्यावसायिक घटकांना "सुरक्षित व विश्वासार्ह" व्यापार भागीदार म्हणून मान्यता देणे;
- जे वेळ व खर्च यातील बचतीत रूपांतरित होतात अशा लाभांद्वारे व्यवसाय संस्थांना प्रोत्साहन देणे;
- निर्यातीपासून आयातीपर्यंतची पुरवठा साखळी सुरक्षित करणे;
- समुद्रपार (विदेशी) आयातदार / निर्यातदारांना पुरवठा करण्याचा करार केला जातो तेव्हा सुरक्षा मानकांचे अनुपालन दर्शविण्याची क्षमता;
- परस्पर मान्यता करार (एमआरए) भागीदार देशांमधील सीमा परवानगी विशेषाधिकारांमध्ये वाढ करणे;
- सुरक्षिततेशी संबंधित व्यत्ययानंतर मालवाहतुकीतील अडथळे कमी करणे;
- समाशोधन प्रक्रिया वेळेत (dwell time) व संबंधित खर्चात घट करणे; आणि
- ज्या देशांशी भारताने परस्पर मान्यता करार (एमआरए) केला आहे अशा देशांशी व्यापार करताना त्या देशांच्या सीमाशुल्कांच्या बाबतीत अनपेक्षित विवाद (प्रश्न), भेडसावत असतील तर, सीमाशुल्क विभागाचा सल्ला / सहाय्य घेणे.

**प्रश्न 7.** **पुरवठा साखळीत सहभागी असलेल्या व्यवसायांसाठी प्राधिकृत आर्थिक कार्यचालक (एईओ) योजना अनिवार्य आहे काय?**

**उत्तर -** नाही. प्राधिकृत आर्थिक कार्यचालक योजना ही पूर्णपणे एक वैकल्पिक योजना आहे. प्राधिकृत आर्थिक कार्यचालक दर्जा मिळण्याकरिता अर्ज करणे हा एक

व्यावसायिक निर्णय आहे, आणि प्राधिकृत आर्थिक कार्यचालक दर्जा संपादन करून घेतल्यावर तुमच्या व्यापाराच्या परिस्थितीवर, पुरवठा साखळीतील तुमच्या भूमिकेवर आणि तुमच्या व्यवसायासाठी जे लाभ यामुळे मिळू शकतात यावर तो अवलंबून आहे.

**प्रश्न 8. भारतीय प्राधिकृत आर्थिक कार्यचालक कार्यक्रमाची रचना काय आहे?**

**उत्तर -** देय केलेल्या लाभांची वाढती कक्षा व अनुपालनकारी शर्ती यानुसार आयातदार व निर्यातदार यांच्यासाठी त्रिस्तरीय कार्यक्रम म्हणजेच एइओ टी-1, एइओ टी-2 व एइओ टी-3 अशी रचना आहे.

याशिवाय, ज्यांना एईओ - एलओ प्रमाणपत्र दिले गेले आहे असे वाहतूक सेवा पुरवठाकार, अभिरक्षक किंवा टर्मिनल प्रचालक, सीमाशुल्क दलाल (कस्टम ब्रोकर), गोदाम प्रचालक यांच्यासाठी एकलस्तरीय कार्यक्रम आहे.

**प्रश्न 9. प्राधिकृत आर्थिक कार्यचालक (ए इ ओ) दर्जाचा वैधता कालावधी किती आहे?**

**उत्तर -** प्राधिकृत आर्थिक कार्यचालक (एइओ) प्रमाणपत्राची वैधता, एइओ टी-1 व एइओ टी-2 यांसाठी तीन वर्षे आणि एइओ टी-3 व एइओ - एल ओ यांसाठी पाच वर्षे आहे.

**प्रश्न 10. भारतातील सर्व सीमाशुल्क केंद्रांवर एइओ प्रमाणपत्र वैध आहे किंवा कसे?**

**उत्तर -** होय, भारतातील सर्व सीमाशुल्क केंद्रांवर एइओ प्रमाणपत्र वैध आहे, म्हणजेच एइओ दर्जा धारकास सर्व सीमाशुल्क बंदरे / विमानतळे / भू-सीमा शुल्क केंद्रे येथे एइओचा लाभ मिळू शकेल.

## एइओचे फायदे

**प्रश्न 11. एइओ दर्जाचे लाभ काय आहेत?**

**उत्तर -** एइओ टी-1, टी-2, टी-3 व एलओएस या सर्व तिन्ही प्रवर्गांसाठी बरेच लाभ आहेत. परिपत्रक क्रमांक 33/2016 सीमाशुल्क, दिनांक 22 जुलै, 2016 याच्या परिच्छेद 1.5.1 मध्ये एइओ टी-1 साठी, परिच्छेद 1.5.2 मध्ये एइओ टी-2 साठी, परिच्छेद 1.5.3 मध्ये एइओ टी-3 साठी, परिच्छेद 1.5.4 मध्ये एइओ एलओसाठी सूचीबद्ध

केले आहेत. काही प्रमुख लाभ खाली सूचीबद्ध आहेत.

अ) आंतरराष्ट्रीय व्यापारात सुरक्षित, खात्रीशीर व अनुपालनकर्ता व्यावसायिक भागीदार म्हणून जगभरात मान्यता आणि ज्यांनी भारताशी परस्पर मान्यता करार / व्याख्या केलेली आहे अशा विदेशी सीमाशुल्क प्रशासनाद्वारे व्यापार सुलभीकरण मिळणे.

ब) त्यांच्या आयात कंटेनरचे थेट बंदराबाहेर वितरण (डी पी डी) करण्याची व निर्यात कंटेनर थेट बंदरात प्रवेश (डी पी ई) करण्याची सुविधा.

क) बँक हमीस (बीजी) शर्तीमधून पूर्णत: किंवा अंशत: सूट, व्यापारी अतिशुल्कात (एम ओ टी) सूट.

ड) सीमाशुल्क भरण्यास दिलेला वाढीव कालावधी (डिफर्ड पेमेंट ऑफ ड्युटीज)

इ) व्यवहारात्मक (ट्रान्झॅक्शनल) पीसीए मधून सूट. ऑनसाईट पीसीए ऐवजी त्यांची निवड एइओच्या जोखीम मूल्यनिर्धारणाच्या आधारे पुन्हा करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

फ) सीमाशुल्क ब्रोकरसाठी ऐपतदारी प्रमाणीकरणातून (सॉलव्हन्सी सर्टिफिकेशन) सूट.

ग) प्रोफाइलिंग करताना, जोखीम विश्लेषण प्रणालीमध्ये कमी जोखीम दर.

ह) परिपत्रक क्रमांक 18/2017 सीमाशुल्क, दिनांक 29.5.2017 अन्वये सुलभ प्रक्रियेमार्फत अंशत: शुल्क परताव्याचे (ड्रॉ बॅक) अधिक जलदगतीने वितरण.

आय) परतावा व अभिनिर्णयाचा जलद मागोवा.

ज) एफटीए / पीटीएच्या संबंधित मूळ स्वप्रमाणति प्रती किंवा परवानगीसाठी आवश्यक असलेली इतर प्रमाणपत्रे स्वीकारली जातील.

के) एइओ कार्यक्रमाचा भाग म्हणून भागीदार शासकीय संस्था आणि इतर हितसंबंधित यांच्याकडून मान्यता.

**प्रश्न 12. सर्व एइओ टी-1 कार्यचालक डीपीडी / डीपीई सुविधेसाठी पात्र आहेत किंवा कसे?**

**उत्तर -** होय. सर्व एइओ टी-1 / टी-2 / टी-3 दर्जा धारक, डीपीडी / डीपीई सुविधेसाठी हक्कदार आहेत. तथापि, त्यांना थेट बंदर पोहचवणी परवानगीसाठी संबंधित मुख्य आयुक्तालयाकडे अर्ज करावयाचा आहे आणि डीपीडी सुविधेसाठी बंदर प्राधिकरणाकडे स्वत: ची नोंदणी देखील करावयाची आहे.

**प्रश्न 13. सीमाशुल्क विभाग व एइओ दर्जा धारक यांच्यातील विवादाच्या सर्व प्रकरणी, अनुक्रमे टी-1, टी-2 व टी-3 च्या बाबतीत बँक हमी रकमेत अनुक्रमे 50%, 25% व शून्य इतकी घट केली आहे किंवा कसे?**

**उत्तर -** नाही. कोणत्याही परिस्थितीत बँक हमीची रक्कम केव्हा 50%, 25% व शून्य केली जाईल ती परिस्थिती क्रमांक सीबीआयसी परिपत्रक 38/2016, दिनांक 22.8.2016 यामध्ये नमूद केली आहे. याशिवाय जेव्हा जप्त केलेला माल तात्पुरता सोडवण्यासाठी सक्षम प्राधिकरणाने बँक हमी सादर करण्याचे आदेश दिलेले असतील तेव्हा अशा प्रकरणांसाठी हे लागू असणार नाही.

**प्रश्न 14. शुल्काच्या थकित प्रदानाची योजना म्हणजे काय?**

**उत्तर -** सीमाशुल्क प्रदान व सीमाशुल्क निपटारा अलग करण्यासाठी ही एक यंत्रणा आहे. ही 'प्रथम निपटारानंतर प्रदान ' या तत्वावर ती आधारित आहे.

दिनांक 2 नोव्हेंबर, 2016 रोजीच्या दोन्ही अधिसूचना क्रमांक 134/2016 सीमाशुल्क (एमटी) व 135/2016 सीमाशुल्क (एमटी) यांन्वये निर्यात शुल्काचे थकित प्रदान नियम, 2016 अिधसूचित करण्यात आले आहे आणि ते 16.11.2016 पासून अंमलात आले आहेत. एइओ कार्यक्रमांतर्गत (एइओ टी-2 व एइओ टी-3) प्रमाणित निर्यातदारांना, या नियमांचा लाभ घेण्यासाठी अधिसूचित करण्यात आले आहे.

**प्रश्न 15. एइओ थकित शुल्क प्रदानाची सुविधा कशी मिळवू शकते?**

**उत्तर -** निर्यात शुल्कावरील थकित प्रदाने नियम, 2016 याच्या नियम 4 नुसार, प्रलंबित प्रदानांचा लाभ घेण्याचा इरादा असलेल्या पात्र निर्यातदाराने अधिकारक्षेत्रीय प्रधान सीमाशुल्क आयुक्त किंवा सीमाशुल्क आयुक्त यांना त्यांचा इरादा कळवावयाचा

आहे. दुसरा उपाय म्हणजे, आयसीईजीएटीच्या www.icegate.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करावयाची आहे.

**प्रश्न 16. थकित शुल्काच्या प्रदानाच्या बाबतीत शुल्क भरण्यासाठी देय तारखा कोणत्या आहेत?**

**उत्तर -** थकित निर्यात शुल्काचे प्रदान यावरील अधिसूचना क्रमांक 28/2017, सीमाशुल्क एनटी, दिनांक 31.3.2017 द्वारे सुधारित केलेल्या अधिसूचना क्रमांक 134/2016 सीमाशुल्क (एनटी) दिनांक 2.11.2016 अनुसार कालमर्यादा खालीलप्रमाणे आहे :-

| शुल्क भरण्यासाठी बीई परत करण्याची तारीख | थकित शुल्क भरण्याचा दिनांक |
|---|---|
| कोणत्याही महिन्याच्या 1 ते 15 व्या दिवसापासून बी/ई | महिन्याच्या 16 तारखेस |
| मार्च खेरीज महिन्याच्या 16 व्या तारखेपासून बी/ई | पुढील महिन्याचा पहिला दिवस |
| 16 / 31 मार्चपासून बी/ई | 31 मार्च |

थकित शुल्क प्रदान योजनेतंर्गत ईलेक्ट्रॉनिक पद्धतीने शुल्क भरावयाचे आहे.

**प्रश्न 17. विदेशांमधील भारतीय एइओंना हे सुविधाकारी लाभ उपलब्ध करून देण्यात येतील किंवा कसे?**

**उत्तर -** होय, ज्या देशांशी भारताने परस्पर मान्यता करारावर (एमआरए) स्वाक्षरी केली आहे त्या देशांना याचे लाभ मिळू शकतील. व्यापारात परस्पर तत्वावर लाभ मिळणे शक्य व्हावे यासाठी संबंधित एइओ कार्यक्रमांना मान्यता देण्याकरिता भारतीय सीमाशुल्क विभागाने दक्षिण कोरिया, तैवान व हाँगकाँग यांच्याशी सीमाशुल्क परस्पर मान्यता करार (एमआरए) स्वाक्षरित केला आहे.

**प्रश्न 18. परस्पर मान्यता करार / व्यवस्था (एमआरए) म्हणजे नेमके काय आहे?**

**उत्तर -** परस्पर मान्यता करार / व्यवस्था (एमआरए) हा ज्यामुळे सीमाशुल्क प्रशासनास आणि खासगी क्षेत्रातील सहभागीदारांना लाभ मिळतो. अन्य कार्यक्रमाच्या एइओ वैधताकार निष्कर्षांना मान्यता देण्यासाठी जे एका व्यवसाय भागीदारी कार्यक्रमाला

मान्यता देतात अशा दोन सीमाशुल्क प्रशासनामधील द्विपक्षीय समझोता आहे. तो जागतिक मालवाहू व्यापार सुरक्षित व सुविधाकारी करण्यास मदत करतो आणि कार्यक्रम सदस्यत्वावर आधारित असलेल्या एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंतच्या (एंड - टू - एंड सप्लाय) पुरवठा साखळी सुरक्षेस चालना देतो.

अनुपालनविषयक कोणत्याही शर्ती कोणत्याही संस्थेस कोणतीही सूट दिली जात नाही. विदेशी बंदरावरील भारतीय निर्यातदारांच्या माल पाठवणीसाठी पद्धतशीर सुविधा व घटता हस्तक्षेप, कमीत कमी प्रमाणात जोखीम यांवर आधारित असलेल्या विस्तारित यंत्रणेच्या संदर्भातील लाभ आहेत.

**प्रश्न 19. सीमाशुल्क दलालांना (ब्रोकर) दिलेल्या एइओ एलओ दर्जाचा लाभ, त्यांच्या ग्राहकांना म्हणजेच आयातदारांना किंवा निर्यातदारांना देखील दिला जाईल किंवा कसे?**

**उत्तर -** नाही. एइओ एलओ दर्जा केवळ अर्जदारांसाठी वैध व लागू असेल मात्र आयातदार किंवा निर्यातदारांसाठी लागू नाही. एइओ दर्जासाठी त्यांनी स्वतंत्रपणे अर्ज करण्याची गरज आहे.

**प्राधिकृत आर्थिक कार्यचालक (एइओ) अर्जाची प्रक्रिया**

**प्रश्न 20. प्राधिकृत आर्थिक कार्यचालकासाठी (एइओ) अर्ज कोठे सादर करावेत?**

**उत्तर -** परिपत्रक क्रमांक 3/2018 सीमाशुल्क दिनांक 17.1.2018 द्वारे उक्त तरतुदीमध्ये सुधारणा करण्यात आली असून त्यात अशी तरतूद आहे की, अर्ज, संबंधित अधिकारक्षेत्रीय सीमाशुल्क मुख्य आयुक्त यांच्या कार्यालयाकडे पाठविण्यात यावा आणि त्याची प्रत एइओ कार्यक्रम व्यवस्थापक आंतरराष्ट्रीय सीमाशुल्क संचालनालयाकडे किंवा काही शंका असल्यास एइओ कार्यक्रम व्यवस्थापक आंतरराष्ट्रीय सीमाशुल्क संचालनालय, दहावा मजला, टॉवर-2, जीवन भारती इमारत, कॅनॉट प्लेस, नवी दिल्ली -11001 यांच्याकडे पाठविण्यात यावी.

अधिकारक्षेत्रीय सीमाशुल्क मुख्य आयुक्ताचे कार्यालय हे जेथे आयातदार/ निर्यातदार/ लॉजिस्टिक ऑपरेटर हे, आंतरराष्ट्रीय पुरवठा साखळीत मोठ्या प्रमाणात व्यवसाय करतात अशा स्वरूपातील आहे.

एइओ टी-1 अर्ज दाखल करण्यासाठी आणि त्यावर प्रक्रिया करण्यासाठी एक ऑनलाईन संकेतस्थळ (वेबसाईट) (डोमेन नाव: deoindia.gov.in) निर्माण करण्यात आलेली आहे. अर्जदार संकेतस्थळावर (वेबसाईटवर) लॉग इन करून एलओटी-1 अर्ज दाखल करू शकतो. अर्ज ऑनलाईन दाखल करण्याबाबत वारंवार विचारले जाणारे प्रश्न जोडपत्र 'अ' म्हणून स्वतंत्रपणे जोडलेले आहेत.

**प्रश्न 21. प्राधिकृत आर्थिक कार्यचालक (एइओ) अर्जांच्या प्रक्रियेसाठी कोणत्या अधिकारक्षेत्रीय मुख्य आयुक्त कार्यालयांना नेमून दिलेले आहे?**

**उत्तर -** आतापर्यंत, प्राधिकृत आर्थिक कार्यचालक (एइओ) अर्जांवर प्रक्रिया करण्यासाठी मुख्य सीमाशुल्क आयुक्तांच्या पुढील कार्यालयांना नेमून दिलेले आहेत :-

अ) नवी दिल्ली

आ) मुंबई विभाग - एक

इ) मुंबई विभाग - दोन

ई) मुंबई विभाग - तीन

उ) अहमदाबाद

ऊ) विशाखापट्टणम

ऋ) भुवनेश्वर

ऌ) बंगळूर

ऍ) चेन्नई

ऎ) हैद्राबाद

ए) कोलकाता

ऐ) थिरूचिरापल्ली

ऑ) पटणा

ऒ) पुणे.

ओ) नागपूर; आणि

औ) भोपाळ

**प्रश्न 22. प्राधिकृत आर्थिक कार्यचालक (एइओ) अर्जावर प्रक्रिया करण्यासाठी आणि एइओ**

**दर्जा देण्याबाबत निर्णय घेण्यासाठी कोण जबाबदार आहे?**

**उत्तर -** परिपत्रक क्रमांक 03/2018 सीमाशुल्क, 26/2018 व 51/2018 याद्वारे सुधारित केलेल्या परिपत्रक क्रमांक 33/2016 मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींनुसार एइओ अर्जांवर प्रक्रिया करण्यासाठी अतिरिक्त/ सह आयुक्त दर्जाचे नोडल अधिकारी प्रमुख असलेल्या अधिकारक्षेत्रीय/ प्रक्षेत्रीय सीमाशुल्क मुख्य आयुक्त यांच्या अंतर्गत असलेले एइओ कक्ष / युनिट जबाबदार आहेत.

अधिकारक्षेत्रीय मुख्य आयुक्त कार्यालयाचा नोडल अधिकारी शिफारशीसह एइओ टी-2 / टी-3 आणि एइओ एलओ यांचा प्रक्रिया केलेला अर्ज, एआयओ अिधमान्यतेबाबत अंतिम निर्णय घेण्यासाठी दिल्ली येथे कार्यालय असलेल्या एइओ कार्यक्रमाच्या भारतीय एइओ कार्यक्रम व्यवस्थापकाकडे पाठवतो.

एइओ टी-1 अिधमान्यतेची प्रक्रिया परिपत्रक क्रमांक 26/2018, दिनांक 10.8.2018 द्वारे आणखी सोपी आणि विकेंद्रीत करण्यात आली आहे. प्रधान आयुक्त / आयुक्त दर्जाच्या क्षेत्रीय एइओ कार्यक्रम व्यवस्थापकाची प्रधान मुख्य आयुक्त किंवा मुख्य आयुक्त प्रमुख असलेल्या प्रत्येक प्रक्षेत्रात नियुक्ती केली होती आणि एइओ अर्ज अंतिमरित्या स्वीकारण्यासाठी किंवा नाकारण्यासाठी त्यांना जबाबदार धरण्यात आले होते. अशाप्रकारे, एइओ कक्षाद्वारे प्रक्रिया केलेल्या एइओ टी-1 अर्जांवरील केवळ प्रक्षेत्रीय स्तरावर निर्णय घेतला जातो. एइओ प्रमाणपत्र तयार करण्यासाठी आंतरराष्ट्रीय सीमाशुल्क संचालनालयाला हा निर्णय कळविण्यात येतो. एइओ टी-1 कार्यक्रमाच्या डिजिटलायझेशननंतर मान्यता प्राप्त अर्ज डिजिटल स्वाक्षरीकृत प्रमाणपत्र निर्माण करण्यासाठी डीआयसी, दिल्ली येथे ऑनलाईन पाठविले जातात.

**प्रश्न 23. भारतीय एइओ कार्यक्रमाचा एइओ कार्यक्रम व्यवस्थापक कोण आहे?**

**उत्तर -** 10 वा मजला, टॉवर-2, जीवन भारती इमारत, कॅनॉट प्लेस, नवी दिल्ली-01 येथे कार्यालय असलेल्या प्रधान आयुक्त, आंतरराष्ट्रीय सीमाशुल्क संचालनालय हा भारतीय एइओ कार्यक्रमासाठी, एइओ कार्यक्रम व्यवस्थापक आहे.

एइओ टी-1 अधिमान्यतेसाठी प्रक्षेत्रीय कार्यक्रम व्यवस्थापकास, सर्व प्रयोजनांसाठी एइओ कार्यक्रम व्यवस्थापक म्हणून समजले जाते.

**प्रश्न 24. चालू योजनेंतर्गत ज्या आर्थिक कार्यचालकाचा अर्ज नाकारला गेला आहे, तो कार्यचालक एइओ दर्जा मिळण्यासाठी पुन्हा अर्ज करू शकतो किंवा कसे?**

**उत्तर -** होय, ज्या कारणांवरून त्यांचा अर्ज नाकारला गेला आहे ती कारणे वैध ठरत नसतील आणि ते एइओ दर्जा मिळण्यास पात्र असतील तर, ते पुन्हा अर्ज करू शकतात.

**प्रश्न 25. एइओ टी-1/ टी-2/ टी-3 एलओ अर्ज दाखल करण्यासाठीच्या शर्ती कोणत्या आहेत?**

**उत्तर -** एइओ टी-1 दर्जासाठी अर्जदाराने, सीबीईसी परिपत्रक क्रमांक 26/2018, दिनांक 10.8.2018 मधील जोडपत्र अ-1, परिशिष्ट अ-2 मध्ये दिलेल्या नमूद केलेल्या घोषणापत्रासह विहित केलेल्या नमुन्यातील ऑनलाईन अर्ज (डोमेन नेम : aeoindia.gov.in) दाखल करावयाचा आहे. परिपत्रक क्रमांक 51/2018, दिनांक 7.12.2018 अन्वये ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी वेब आधारित प्रतिमानाची (मॉड्यूलची) ओळख दिल्यानंतर ऑनलाईन अर्ज दाखल करणे अनिवार्य आहे.

एइओ टी-2, एइओ टी-3 व एइओ एलओ उर्वरित एइओ दर्जापैकी यांसारख्या कोणताही दर्जा मिळण्यासाठी अर्जदाराने खालील तक्त्यात विनिर्दिष्ट केलेल्या नमुन्यात अर्ज सादर करावा. परिपत्रक क्रमांक 33/2016, सीमाशुल्क मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अर्जाच्या नमुन्यात, दहा जोडपत्रे अंतर्भूत आहेत. तथापि, अर्जदाराने खाली नमूद केल्याप्रमाणे केवळ त्याला लागू असलेली जोडपत्रेच केवळ भरण्याची व सादर करण्याची आवश्यकता आहे :-

| अनुक्रमांक | जोडपत्र | विषय | एइओ टी-2 | एइओ टी-3 | एइओ एलओ |
|---|---|---|---|---|---|
| 1. | जोडपत्र -अ | अर्जाचा नमुना | होय | होय | होय |
| 2. | जोडपत्र -ब | सुरक्षा योजना | होय | होय | होय |
| 3. | जोडपत्र -क | प्रक्रिया नकाशा | होय | होय | होय |
| 4. | जोडपत्र -ड | क्षेत्र योजना | होय | होय | होय |

| स्वयं-मूल्य निर्धारण नमुना | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 5. | जोडपत्र -इ 1 | सर्वसाधारण अनुपालन | होय | होय | होय |
| 6. | जोडपत्र -इ 2 | कायदेशीर अनुपालन | होय | होय | होय |
| 7. | जोडपत्र -इ 3 | वाणिज्यिक व जेथे उचित असेल तेथे वाहतुकीचे अभिलेख याचे व्यवस्थापन करणे | होय | होय | होय |
| 8. | जोडपत्र -इ 4 | आर्थिक पतदारी | होय | होय | होय |
| 9. | जोडपत्र -इ 5 | सुरक्षा व सुरक्षितता | होय | होय | होय |
| 10. | जोडपत्र -एफ | व्यवसाय भागीदार तपशील | नाही | होय | नाही |

**प्रश्न 26. विद्यमान एइओ दर्जा धारक उच्च एइओ दर्जासाठी अर्ज करू शकतो का? असल्यास, असा अर्ज भरण्याची मुदत मर्यादा किती आहे?**

**उत्तर -** विद्यमान एइओ प्रमाणपत्रधारक उच्च एइओ दर्जासाठी अर्ज करू शकतो. या आधीचे प्रमाण्पत्र दिल्याच्या दिनांकापासून उच्च दर्जासाठी अर्ज करण्याकरिता कोणतीही मुदत मर्यादा नाही. उदाहरणार्थ एइओ टी-1, दर्जा धारक, एइओ टी-1 प्रमाणपत्र मिळाल्यानंतर कोणत्याही वेळी, टी-2 दर्जासाठी अर्ज करू शकते.

तथापि, एइओ टी-2 दर्जा धारकासाठी एइओ टी-3 दर्जासाठी किंवा जेव्हा आंतरराष्ट्रीय पुरवठा साखळीतील सर्व व्यवसाय भागीदारांनी एकतर एइओ टी-2 किंवा एलओ दर्जा प्राप्त केलेला असेल तेव्हा अर्ज करण्याची किमान मुदत मर्यादा दोन वर्षे इतकी आहे.

**प्रश्न 27. अर्ज करण्यासाठी संपर्क व्यक्ती किंवा प्राधिकृत व्यक्ती म्हणून सल्लागाराची नेमणूक करता येऊ शकते का?**

**उत्तर -** नाही. अर्जदाराने केवळ कंपनीच्या स्वत:च्या प्रशासनातील संपर्क व्यक्ती / प्राधिकृत प्रतिनिधी नामनिर्देशित करावयाची आहे. (परिपत्रक क्रमांक 33/2016 सीमाशुल्क याचा परिच्छेद 2.3)

## एइओ होण्याची पात्रता/शर्ती

**प्रश्न 28. एइओ दर्जासाठी कोण अर्ज करू शकतो ?**

**उत्तर -** जी आंतरराष्ट्रीय पुरवठा साखळीचा भाग आहे; जी मालाच्या वाहतुकीत ने-आण करण्यात सहभागी आहे आणि जिने भारतातील सीमाशुल्क कायद्यांन्वये दायित्त्वे पूर्ण करणे आवश्यक आहे अशी कोणतीही व्यवसाय संस्थाच केवळ एइओ दर्जासाठी अर्ज करू शकते. यामध्ये निर्यातदार, आयातदार, मालवाहतूक (लॉजिस्टिक) पुरवठाकार (उदा. मालवाहक (कॅरियर), हवाई वाहतूक सेवा (एअरलाइन्स), वाहतूक अग्रेषक (फ्राईट फॉरवर्डस) इ.), अभिरक्षक किंवा टर्मिनल कार्यचालक (ऑपरेटर), सीमाशुल्क गृह अभिकर्ते (कस्टम हाऊस एजंट्स) आणि गोदाम (वेअरहाऊस) मालक, बंदर कार्यचालक, प्राधिकृत कुरिअर्स, जहाजावर माल चढवणारे व उतरवणारे कामगार (स्टेव्हडर्स), इत्यादींचा समावेश असेल. ही यादी परिपूर्ण नाही.

**प्रश्न 29. भारतीय एइओ दर्जासाठी अर्ज करण्याचे व्यावसायिक संस्थांसाठी पात्रतेचे निकष काय आहेत ?**

**उत्तर -** एइओ दर्जा देण्याच्या पात्रता शर्ती व निकष, परिपत्रक क्रमांक 3/2016, दिनांक 17 जुलै, 2018 द्वारे सुधारणा केलेल्या एइओ परिपत्रक क्रमांक 33/2016, दिनांक 22 जुलै, 2018 च्या कलम 3 मध्ये सूचीबद्ध करण्यात आले आहेत.

संस्थांनी पुढील निकषांची पूर्तता करावी :-

अ) भारतात स्थापन झालेली असावी;

ब) व्यवसाय, सीमाशुल्क संबंधित कामकाजात सहभागी असावा ;

क) गेल्या आर्थिक वर्षात, व्यवहाराशी संबंधित किमान 25 सीमाशुल्कविषयक दस्तऐवजांवर प्रवेश प्रपत्र (बिल ऑफ एंट्री) किंवा नौभरण देयक (शिपिंग बिल) कार्यवाही केलेली असावी.

ड) मागील 3 आर्थिक वर्षे व्यवसाय कार्य करीत असावा.

**प्रश्न 30. एखाद्या कायदेशीर संस्थेची शाखा स्वतंत्र एइओ दर्जासाठी अर्ज करू शकतो का ?**

**उत्तर -** नाही. अर्जदाराच्या कायदेशीर संस्थेची विशिष्ट जागा, विभाग किंवा शाखा यांना एइओ दर्जा देण्याची कोणतीही तरतूद नाही.

**प्रश्न 31. नव्याने स्थापन केलेली कंपनी एइओ दर्जासाठी अर्ज करू शकते किंवा कसे ?**

**उत्तर -** भारतीय एइओच्या शर्तींनुसार अर्जदार, अर्ज करण्याच्या तारखेच्या वित्तीय वर्षाच्या आधीच्या किमान तीन गत वित्तीय वर्षांसाठी व्यवसाय कार्ये करीत असावा. तथापि, अपवादात्मक प्रकरणी, नव्याने स्थापन केलेल्या व्यवसाय संस्थेच्या अंतर्गत नियंत्रणाच्या प्रत्यक्ष पडताळणीच्या आधारे, एइओ कार्यक्रम व्यवस्थापक, प्रमाणीकरणासाठी तिचा विचार करू शकतो.

**प्रश्न 32. आयातदार/निर्यातदार म्हणून तीन स्तरीय एइओ कार्यक्रमांतर्गत आणि मालवाहतूक (लॉजिस्टिक्स) पुरवठाकार म्हणून एकल स्तरीय एइओ कार्यक्रमांतर्गत येणारी कायदेशीर संस्था एइओ टी-1/टी 2/टी 3 किंवा एइओ एलओच्या एकल अधिस्वीकृतीसाठी अर्ज करू शकते किंवा कसे ?**

**उत्तर -** नाही. अशा आर्थिक कार्यचालकाने आयातदार/निर्यातदार यांचा त्रिस्तरीय कार्यक्रमासाठी किंवा एइओ एल ओ दर्जा एकल स्तरीय कार्यक्रमासाठी स्वतंत्रपणे अर्ज करावा.

**प्रश्न 33. एइओ कार्यक्रम सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांसाठी खुला आहे किंवा कसे ?**

**उत्तर -** होय, एइओ कार्यक्रमामध्ये, अल्प, लघु व मध्य उद्योजक (एमएसएमई) समाविष्ट आहेत आणि आकारमान विचारात न घेता, पात्रता शर्ती आणि एइओ दर्जा देण्याचे निकष, समान आहेत. संस्थेने मागील वित्तीय वर्षांमध्ये किमान 25 दस्तऐवज हाताळलेले असावे हीच केवळ शर्त आहे.

**प्रश्न 34. एइओ दर्जासाठी अर्ज करण्याच्या कायदेशीर शर्ती काय आहेत ? कोणते दस्तऐवज सादर करावयाचे आहेत ?**

**उत्तर -** एइओ दर्जासाठी अर्ज करण्याच्या कायदेशीर शर्ती परिपत्रक क्र.33/2016-सीमाशुल्क यातील परिच्छेद-3.2 आणि जोडपत्र इ-2 मध्ये विहित केल्याप्रमाणे आहेत.

**प्रश्न 35. अर्जाच्या तारखेच्या पूर्वीच्या मागील तीन वित्तीय वर्षात व्यवसाय कार्य असल्याचा**

**पुरावा म्हणून कोणते दस्तऐवज सादर करावयाचे आहे ?**

**उत्तर -** दस्तऐवज (पुरावे) यांत, विधिसंस्थापन प्रमाणपत्र, आयात-निर्यात संकेतांक (आयईसी), तीन वर्षांचे ताळेबंद, इत्यादींचा समावेश आहे.

**प्रश्न 36. जेव्हा अर्जदाराकडे लेखापरिक्षित ताळेबंद नसेल अशा बाबतीत, त्या जागी कोणते दस्तऐवज सादर करावयाचे आहेत ?**

**उत्तर -** जेव्हा कायदा अर्जदारास सांविधिक लेखापरीक्षेतून सूट देत असेल अशा प्रकरणी अर्जदार, एइओ अर्जाच्या प्रयोजनार्थ, नफा/तोटा आणि नक्त मूल्य (निव्वळ मोल) दर्शविणारे मालक/भागीदार/व्यवस्थापकीय संचालक आणि कोणताही सनदी लेखापाल (सीए) या दोहोंनी प्रमाणित केलेला ताळेबंद सादर करता येऊ शकेल.

**प्रश्न 37. स्वत:ची खाती असल्याचा पुरावा म्हणून व्यवसाय संस्थेने कोणते दस्तऐवज सादर करण्याची गरज आहे ?**

**उत्तर -** स्वत:ची खाती असलेल्या कंपनीच्या व्यवसायाचा पुरावा म्हणून आवश्यक असणारी कागदपत्रे/पुरावे यात रद्द केलेला चेक, लेखा विवरणपत्र लेखापरिक्षित शिलकीचे विवरणपत्र याचा समावेश आहे.

**प्रश्न 38. अनियमितता हेतू ओळखण्यासाठी/उघड करण्यासाठी कोणती कार्यपद्धती प्रस्थापित केली आहे ?**

**उत्तर -** याचा अर्थ, आयात केलेल्या मालाचे स्व-मूल्यनिर्धारण करण्यासाठी म्हणजेच वर्गीकरण, मूल्यांकन, इत्यादींची योग्य तपासणी करण्यासाठी अर्जदाराकडे, सीमाशुल्क दस्तऐवजांमधील (बी/एल, बीजक व पॅकिंग यादी) जोखीम ओळखण्यासाठी व दोष (त्रुटी) शोधून काढण्यासाठी सुसज्ज सॉफ्टवेअरच्या व प्रत्यक्ष तपासणीच्या स्वरूपातील साधने असली पाहिजेत आणि सीमाशुल्क नियंत्रणातून मालाचे समाशोधन केल्यानंतर (माल सोडवून घेतल्यानंतर) त्यांच्याकडे, शुल्क भरणा बीजक व पॅकींग यादी यांच्याशी मालाचा मेळ घालण्याची प्रक्रिया असली पाहिजे.

याशिवाय, प्रत्यक्ष वेळेच्या आधारे सीमाशुल्क विभागाच्या निदर्शनास

आलेल्या त्रुटी (दोष) कळविण्यासाठी आणि अशा चुका पुन्हा होऊ नयेत यासाठी त्यांच्या कर्मचाऱ्यांना दाखविण्यासाठी अशा त्रुटींचा अभिलेख ठेवण्यासाठी त्यांच्याकडे दस्तऐवजीकरणाची प्रक्रीया/एस ओपी/एस्कलेश मॅट्रिक्स असू शकेल.

**प्रश्न 39. जोडपत्र इ.2 चा अनुक्रमांक ड (दोन) येथे सूचीबद्ध केलेल्या मागणी केलेले शुल्क व प्रदान केलेले शुल्क यांतील प्रमाण कसे परिगणित केले जाते ?**

**उत्तर -** सीमाशुल्क अधिनियमान्वये काढलेल्या एस सी एन मध्ये अंतर्भूत असलेल्या शुल्काच्या रकमेस मागील तीन वित्तीय वर्षांमध्ये प्रदान केलेले एकूण शुल्क व अंशत: शुल्क परतावा (ड्यूटी ड्रॉ बॅक) यांच्या रकमेने भागून हे प्रमाण मोजले जाते. उदाहरणार्थ, कारणे दाखवा नोटीसीमध्ये (एससीएन)/विवादित मागणीमध्ये अंतर्भूत असलेली रक्कम (यात मागणी केलेले शुल्क व नाकारलेली करप्रतिग्रहाची रक्कम अंतर्भूत आहे) रु.500/- इतकी असेल आणि प्रदान केलेले एकूण शुल्क 20000/- व मागितलेली करप्रतिग्रहाची रक्कम रु.5000/- असेल तर यातील गुणोत्तर 500/(20000+5000)*100 =2 % इतके असेल.

**प्रश्न 40. मागणी केलेले शुल्क व प्रदान केलेले एकूण शुल्क/मागितलेल्या करप्रतिग्रहाची रक्कम यातील गुणोत्तर 10 % पेक्षा अधिक असल्यास अर्जदार एइओ अधिस्वीकृतीसाठी पात्र ठरेल किंवा कसे?**

**उत्तर -** होय. 10 % पेक्षा अधिक गुणोत्तर असल्यास, अशा बाबतीत, एइओ कार्यक्रमात, मागणी केलेल्या शुल्काच्या प्रकरणांच्या स्वरूपाची तपासणी करण्याचे योजिलेले आहे. अथवा एइओ दर्जा देण्याचा किंवा चालू ठेवण्याचा निर्णय काढलेल्या कारणे दाखवा नोटीशीच्या (एससीएन) तपासणीच्या आधारे एइओ कार्यक्रम व्यवस्थापकाच्या स्वेच्छाधिकारावर अवलंबून आहे.

**प्रश्न 41. जोडपत्र ई-3- वाणिज्यिक व वाहतूकविषयक अभिलेखांचे व्यवस्थापन-यांचे अनुपालन केल्याची सुनिश्चिती करण्यासाठी कोणते दस्तऐवज ठेवण्याची आवश्यकता आहे ?**

**उत्तर -** एइओ अर्जदाराने, पुढील दस्तऐवज ठेवावे :-

अ) जे अभिलेख आयात-निर्यात अशा दोन्हींशी संबंधित असलेल्या माल वाहतुकीचे लेखापरीक्षण करण्यासाठी सीमाशुल्क विभागास ज्यास परवानगी देते असे अभिलेख ठेवणे ;

ब) आवश्यक अभिलेख मिळण्याची सीमाशुल्क विभागास पूर्णपणे मुभा देणे ;

क) अंतर्गत अभिलेख मिळण्याची सुविधा व नियंत्रण प्रणाली असणे ;

ड) व्यापारी मालाची आयात किंवा निर्यात यांच्याशी संबंधित असलेले कोणतेही प्राधिकारपत्र, मुखत्यारपत्र व लायसन व्यवस्थितपणे ठेवणे व ते सीमाशुल्क विभागास उपलब्ध करून देणे ;

इ) सीमाशुल्क विभागास नंतर सादर करण्यासाठी अभिलेख योग्यरीतीने जतन करून ठेवणे - उदाहरणार्थ, सीमाशुल्क प्रयोजनाकरिता, किमान पाच वर्षे अभिलेख ठेवला पाहिजेत.

फ) अनधिकृत व्यक्तींना शिरकाव करण्यापासून संरक्षण करता येईल माहिती तंत्रज्ञान सुरक्षाविषयक उपाययोजना करणे.

**प्रश्न 42. एइओने कोणती लेखांकन पद्धती अनुसरणे आवश्यक आहे ? [जोडपत्र ई-3 (क)] ?**

**उत्तर -** सीमाशुल्क विभागाच्या नियंत्रणावर आधारित लेखापरीक्षा करण्यास सुलभ आहे अशी सर्वसाधारणपणे स्वीकृत लेखांकन तत्त्वे (जीएएपी)/आंतरराष्ट्रीय वित्तीय प्रतिवेदन मानके (आयएफआरएस) यांच्याशी सुसंगत असणारी कोणतीही लेखांकन पद्धती स्वीकारता येऊ शकते. लेखापरीक्षकाने लेखापरीक्षण केलेल्या ताळेबंदामध्ये अर्जदाराने स्वीकारलेल्या लेखांकन पद्धती बद्दलचा शेरा अंतर्भूत असेल.

**प्रश्न 43. जोडपत्र ई-3 (ब) अनुसार आवश्यक असलेल्या अनुपालनाच्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ, म्हणजेच बेकायदेशीर किंवा अनियमित संव्यवहार शोधून काढण्यासाठी पुरेशी**

**प्रशासकीय मांडणी व अंतर्गत नियंत्रण विषयक कोणते कागदोपत्री पुरावे आवश्यक आहेत ?**

**उत्तर -** सर्वसाधारणपणे, लेखापरिक्षित वित्तीय विवरणपत्रात/ताळेबंदात व्यवसायाच्या आकाराशी अनुरूप प्रशासनिक मांडणी आहे किंवा कसे याविषयी केलेल्या भाष्याचा अंतर्भाव असतो. मालाची हाताळणी करण्यासाठी केलेली समाधानकारक सुसंघटित मांडणी आणि आंतरराष्ट्रीय पुरवठा साखळीतील त्याच्याशी संबंधित असलेले दस्तऐवज या अंतर्गत नियंत्रणाच्या अन्य शर्ती आहेत.

**प्रश्न 44. जोडपत्र ई-3 (ड) अनुसार दस्तऐवजांची साठवण व जतन करून ठेवण्यासाठी आवश्यक असलेल्या अनुपालनाच्या दाव्याच्या पुष्ट्यर्थ कोणते कागदोपत्री पुरावे आवश्यक आहेत ?**

**उत्तर -** अर्जदाराकडे, अभिलेख व माहिती साठवण्यासाठी व जतन करण्यासाठी दस्तऐवजीकृत प्रक्रिया/प्रमाण कार्यचालन कार्यपद्धती (एसओपी) असली पाहिजे. एसओपीमध्ये, संबंधित व्यक्तीची जबाबदारी साठवण/जतन करण्याचा कालावधी, माहिती गहाळ होण्यापासून संरक्षण करण्यासाठी माहिती पुन्हा-पुन्हा साठवून ठेवणे (बॅकअप) यांसारख्या योग्य उपाययोजना हाती घेण्याची प्रक्रिया यांसह साठवणूक प्रक्रियेचा अंतर्भाव आहे. जर अर्जदाराने बाह्यस्त्रोताद्वारे अभिलेखांचे साठवण व जतन केले असेल तर, अभिलेख साठवणाऱ्या एजन्सीबरोबर केलेल्या करारामध्ये वरील शर्तींचा समावेश करावा आणि अर्जासोबत असे करार सादर करावेत.

**प्रश्न 45. जोडपत्र इ-3 (पाच) च्या शर्ती म्हणजेच कर्मचाऱ्याने सीमाशुल्क विभागास अनुपालन करण्यातील अडचणींविषयीची माहिती देण्याच्या गरजा कोणत्या आहेत ?**

**उत्तर -** अर्जदार, त्याच्या कर्मचाऱ्यांना सीमाशुल्कविषयक अनुपालनाबाबत शिक्षण/प्रशिक्षण देण्याची त्यांची पद्धती/प्रक्रिया सादर करू शकेल. या प्रक्रियेत, अनुपालन करताना येणाऱ्या अडचणी, कोणत्याही असल्यास, त्या पदनिर्देशित सीमाशुल्क अधिकाऱ्यास कळविण्याच्या कार्यपद्धतीचा समावेश असला पाहिजे. वरील प्रयोजनासाठी अर्जदार त्याच्या संघटनेतील एका व्यक्तीस पदनिर्देशित करू शकेल.

**प्रश्न 46. ऐपतदारी विषयक हमीपत्रासाठी व ऐपतदारी प्रमाणपत्रासाठी कोणताही नमुना आहे काय ?**

**उत्तर-** नाही. एइओ परिपत्रक क्र.33/2016-सीमाशुल्क यामध्ये याबाबतचा कोणताही नमुना नाही. लेखापुस्तके व वित्तीय विवरणपत्रे, करविवरणपत्रे, इत्यादींवर आधारित असलेले मागील तीन वित्तीय वर्षांचे (प्रत्येक वर्षाचे) प्रमाणपत्र जोडलेले असावे. केवळ हीच शर्त आहे.

**प्रश्न 47. सुरक्षा योजना (जोडपत्र-ब) सादर करणे आणि एइओ परिपत्रक 33/2016 याच्या जोडपत्र इ-5 मध्ये सूचीबद्ध केलेल्या शर्तींची पूर्तता कोणी करणे आवश्यक आहे ?**

**उत्तर -** एइओ टी 2, टी 3 व एइओ एल ओ साठीच्या अर्जदाराने, सुरक्षा योजना व जोडपत्र इ-5-1 ते इ-5-7 यांमध्ये सूचीबद्ध केलेल्या सुरक्षा व संरक्षण विषयक शर्तींची पूर्तता केल्याच्या पुष्ट्यर्थ, दस्तऐवज/पुरावे सादर करणे आवश्यक आहे.

**प्रश्न 48. एइओ अर्जदारासाठी सुरक्षा व संरक्षण विषयक कोणत्या शर्ती आहेत ?**

**उत्तर -** सुरक्षा व संरक्षण विषयक निकष परिपत्रक 33/2016 यातील परिच्छेद 3.5.2 व जोडपत्र इ-5.1 ते इ-5.7 यांमध्ये सूचीबद्ध केलेले आहेत. त्याचे पुढील सात घटक आहेत :-

अ) प्रक्रियात्मक सुरक्षा (संदर्भ परिच्छेद 3.5.2)

ब) जागेची सुरक्षितता (संदर्भ परिच्छेद 3.5.3)

क) मालवाहतुकीची सुरक्षा (संदर्भ परिच्छेद 3.5.4)

ड) वाहतूक सुरक्षा (संदर्भ परिच्छेद 3.5.5)

इ) कर्मचारीविषयक सुरक्षा (संदर्भ परिच्छेद 3.5.6)

फ) व्यावसायिक भागीदार सुरक्षा (संदर्भ परिच्छेद 3.5.7)

ग) सुरक्षाविषयक प्रशिक्षण व धोक्याविषयक जागृती (संदर्भ परिच्छेद 3.5.8)

**प्रश्न 49. एइओ टी-3 अर्जदारासाठी अतिरिक्त शर्ती कोणत्या आहेत ?**

**उत्तर -** एइओ टी-2 अर्जदारासाठी विहित केलेले दस्तऐवज सादर करणे व शर्तींची पूर्तता

करणे यांव्यतिरिक्त, एइओ टी-3 अर्जदाराने परिपत्रक क्रमांक 33/2016, दि.22.7.2016 च्या जोडपत्र फ मध्ये विहित केलेला तपशील सादर करावायाचा आहे. जोडपत्र फ मध्ये अर्जदाराने ज्या आंतरराष्ट्रीय पुरवठा साखळीतील त्याच्या सर्व व्यावसायिक भागीदाराचा (भागीदारांचा) तपशील द्यावयाचा असून त्यात भारतीय एइओ कार्यक्रमांतर्गत त्यांच्या अधिस्वीकृतीचा समावेश आहे. जोडपत्र "फ" च्या नमुन्यामध्ये घोषणापत्र द्यावयाचे आहे. मागील दोन वित्तीय वर्षासाठी जो एइओ टी-2 प्रमाणपत्र धारक नाही अशा एइओ टी-3 अर्जदाराचे सर्व व्यावसायिक भागीदार (सीबी, फ्रेट फॉर्वर्डर, लायनर इ.) एइओ टी-2 किंवा एइओ-एल ओ प्रमाणपत्र धारक असले पाहिजेत.

**प्रश्न 50. एइओ च्या जोडपत्र अ मध्ये केलेल्या घोषणापत्रासोबत कोणते दस्तऐवज सादर करावयाचे आहेत ?**

**उत्तर -** अर्जासोबत पुढील दस्तऐवज सादर करणे आवश्यक आहे :-

अ) कंपनी निबंधाकडील (आरओसी) विधि संस्थापन प्रमाणन ;

ब) एसीपी/एइओ दर्जाविषयक घोषणापत्र (स्वत:चे);

क) जेथे आंतरराष्ट्रीय पुरवठा साखळीत मालाची हाताळणी केली जाते त्या ठिकाणचा

व प्रशासकीय कार्यालयांचा पत्ता/जागा/स्थळे ;

ड) मागील तीन वर्षांचे लेखापरिक्षित वित्तीय लेखे ;

इ) मागील तीन वर्षांचे बँकेचे लेखे ;

फ) जीएसटीआयएन, आयइसी, पीएएन, कंपनी विधिसंस्थापन ;

ग) मागील वित्तीय वर्षामध्ये हाताळलेल्या मालाचे प्रवेशपत्र व नौभरण देयक ;

ह) व्यवसायांची ठिकाणे आणि त्यांचे पत्ते व दूरध्वनी क्रमांक ;

आय) डीआयएन क्रमांकासह संचालकांची यादी ;

ज) अर्जदाराने सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम असल्याचा दावा केला असेल

तर, सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम अधिनियमांन्वये दिलेला पुरावा/प्रमाणपत्र ;

के) मालक/ भागीदार/ संचालक मंडळ/ व्यवस्थापकीय संचालक यांच्याकडून अर्जदाराच्या संपर्क अधिकाऱ्यासाठी/व्यक्तीसाठी प्राधिकारपत्र ;

**प्रश्न 51. अर्जदाराची माहिती असणाऱ्या सर्व जागांसाठी जोडपत्र ब (सुरक्षा आराखडा) द्यावयाचे आहे किंवा कसे ?**

**उत्तर -** होय. तथापि, कंपनीच्या सर्व ठिकाणांसाठी कंपनीची लिखित व पडताळणी योग्य धोरणे, कार्यपद्धती, प्रक्रिया, कार्यपद्धती, प्रवेश नियंत्रण व अन्य सुरक्षा विषयक धोरणे, प्रशिक्षण व कौशल्य विकास आणि शासकीय अनुपालन सारखेच असेल तर, अर्जदार, आंतरराष्ट्रीय पुरवठा साखळीत वापरलेल्या त्याच्या सर्व जागांसाठी जी वैध असेल अशा तिचा कोणत्याही जागेचा सुरक्षा आराखडा सादर करू शकतो.

**प्रश्न 52. जोडपत्र क (प्रक्रिया नकाशा) म्हणजे काय ? अर्जदाराची मालकी असणाऱ्या जागांशी तो संबंधित आहे किंवा कसे ?**

**उत्तर -** प्रक्रिया नकाशा, मालाचा ओघ, मालाची निर्यात/पोचवणी/प्राप्ती याचा आदेश मिळाल्यापासूनचे दस्तऐवजीकरण/माहिती दर्शवितो. निर्यात, आयात, मालवाहतूक कार्यचालक, इत्यादींसाठी सुविधा देणे यांसारख्या प्रत्येक कामासाठी ती स्वतंत्र असेल. म्हणून जोडपत्र क हे, अर्जदाराच्या प्रत्येक कामासाठी असेल. प्रक्रिया नकाशामध्ये, पुरवठा साखळीतील अर्जदाराची व त्याच्या भागीदारांची भूमिका यांचा समावेश असला पाहिजे.

**प्रश्न 53. अर्जदाराची मालकी असणाऱ्या सर्व जागांसाठी जोडपत्र ड (स्थळ आराखडा) द्यावयाचा आहे किंवा कसे ?**

**उत्तर -** होय. परिपत्रकाच्या जोडपत्र ड मध्ये विहित केलेला स्थळ आराखडा हा सर्व ठिकाणे/स्थळे यांच्यासाठी असावा.

**प्रश्न 54. सर्वसाधारण अनुपालनासाठी (जोडपत्र इ-1) आवश्यक असलेले दस्तऐवज कोणते आहेत ?**

**उत्तर -** सर्वसाधारण अनुपालनासाठी पुढील दस्तऐवज आवश्यक आहेत :-

अ) कोणतीही असल्यास, एइओ प्रमाणपत्राची प्रत;

ब) आयईसीची, जीएसटीआयएनची प्रत;

क) नोंदणीच्या प्रतीसह व्यवसाय संस्थेच्या प्रकाराबाबतचे घोषणापत्र. उदाहरणार्थ सार्वजनिक किंवा खाजगी मर्यादित संस्थेच्याबाबतीत, आरओसीने निर्गमित कलेले विधिसंस्थापन प्रमाणपत्र; भागीदारी संस्थेच्याबाबतीत नोंदणीकृत संस्था करार; लघुमालकीच्या भागीदारी संस्थेच्याबाबतीत, स्थानिक दुकाने व आस्थापना अधिनियमान्वये निर्गमित केलेले लायसन इत्यादी;

ड) जेथे वस्तू हाताळण्यात येतात त्या ठिकाणांची/ स्थानाची सूची (उदा. माल चढविणे, उतरविणे, साठविणे, इत्यादी);

इ) स्वत:चे खाते असणाऱ्या व्यवसायाचा पुरावा म्हणून अर्जदाराच्या बँक खात्याचा पुरावा दर्शवणारा रद्द केलेला धनादेश किंवा प्रमाणपत्र, बँक खात्याचे विवरणपत्र;

फ) मागील वित्तीय वर्षामध्ये हाताळलेल्या दस्तऐवजांची प्रवेश विपत्र, नौवहन देयक)

सूची;

ग) कोणतेही असल्यास, फौजदारी अपराधातील दोषसिद्धीचे तपशिलासह घोषणापत्र.

## एइओ अर्जाची प्रक्रिया

**प्रश्न 55. कोणत्या प्रकरणी, एइओ अधिस्वीकृतीसाठी अर्जावर प्रक्रिया केली जात नाही किंवा तो दुरूस्तीसाठी परत केला जात नाही?**

**उत्तर -** पुढील प्रकरणी एइओ अधिस्वीकृतीसाठी अर्जावर प्रक्रिया केली जात नाही :-

अ) जेव्हा अर्ज अपूर्ण असतो तेव्हा. संपूर्ण माहितीसह अर्ज पुन्हा सादर करण्यात यावा.

ब) जेव्हा वैध व्यक्तीमार्फत अर्ज करण्यात आला नसेल तेव्हा तो संबंधित वैध
व्यक्तीमार्फत पुन्हा सादर करता येऊ शकतो.

क) जेव्हा संपर्क व्यक्ती म्हणून कोणत्याही जबाबदार व्यक्तीस नामनिर्देशित केले जात नसेल तेव्हा. जेव्हा अर्जदार केवळ त्याच्या/ तिच्या संघटनेतील एखाद्या जबाबदार व्यक्तीस अर्जदार नामनिर्देशित करतो तेव्हा अर्ज पुन्हा सादर करता येऊ शकतो, अशी व्यक्ती एइओ कार्यक्रमासाठी संपर्क व्यक्ती असेल.

ड) जेव्हा अर्ज करण्याच्यावेळी अर्जदार दिवाळखोरीच्या कार्यवाहीस अधीन असतो तेव्हा. जेव्हा अर्जदार ऐपतदार होतो तेव्हा अर्ज पुन्हा सादर करता येऊ शकतो.

इ) जेव्हा एइओ दर्जा काढण्यात आला असेल तेव्हा - दिनांकापासून एइओ टी-1 व टी-2 च्या बाबतीत एका वर्षानंतर एइओ टी-3 व एलओ च्याबाबतीत, तीन वर्षानंतर अर्ज सादर करता येऊ शकतो.

**प्रश्न 56. कोणत्या प्रकरणी एइओ अर्ज नामंजूर करण्यात येऊ शकतो?**

**उत्तर -** पुढील दोन प्रकरणी एइओ अर्ज नामंजूर करण्यात येऊ शकतो.

(एक) जेव्हा अर्जदार एइओ दर्जा देण्यासाठी पात्र नसेल तेव्हा, किंवा

(दोन) अर्जातील निदर्शनास आलेली विसंगती दूर करता येत नसेल तेव्हा.

**प्रश्न 57. एइओ अर्जांवर प्रक्रिया करण्याची कालमर्यादा व कार्यपद्धती काय आहे?**

**उत्तर -** एइओ टी-1 च्या अर्जाच्याबाबतीत, जर परिपत्रक क्रमांक 33/2016-सीमाशुल्क याच्या कलम 3 मध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रमाणपत्र देण्याच्या पात्रता शर्तीची व

निकषांची पूर्तता करण्यात आली असल्याबद्दल एइओ कार्यक्रम व्यवस्थापकाची खात्री पटली असेल तर, माहिती दस्तऐवज सादर केल्यापासून 30 दिवसांच्या आत, एइओ टी-1 प्रमाणपत्र देण्यात येईल.

एइओ टी-1 साठी अर्ज करण्याची व त्यावर कार्यवाही करण्याची पद्धत, डिसेंबर 2018 पासून ऑनलाईन करण्यात आली आहे.

एइओ टी-2 व एलओ अर्जाच्याबाबतीत, आवश्यक असलेली सर्व माहिती/ दस्तऐवज सादर केल्यावर, तो प्राप्त झाल्यास 30 दिवसात अर्जदारास कळविण्यात येईल. एइओ चमूकडे प्रत्यक्ष सोपविलेल्या अर्जाची प्रत्यक्ष पडताळणी अर्जदाराशी विचारविनिमय करून 15 दिवसांच्या आत करण्यात येईल. एइओ कार्यक्रम चमू 90 दिवसांच्या आत अर्जदाराच्या जागेला भेट देईल. जर 45 दिवसांच्या आत भेटीचे नियोजन केले नाही तर, अर्जदार, कार्यक्रम व्यवस्थापकाशी संपर्क साधू शकतो. एइओ कार्यक्रम चमू अहवाल तयार करील आणि भेट पूर्ण झाल्याची शिफारस 60 दिवसांच्या आत करील. कार्यक्रम व्यवस्थापक एइओ चमूच्या शिफारशीपासून 30 दिवसांच्या आत, एइओ टी-2/ एलओच्या स्थितीबद्दलची माहिती अर्जदाराला देईल. अशाप्रकारे, अर्ज सादर केल्यापासून प्रमाणपत्र देण्यात येईपर्यंत लागणारा एकूण कालावधी, कमाल 180 दिवस इतका अंदाजित केला आहे.

एइओ टी-2 दर्जाधारकाच्या एइओ टी-3 अर्जाच्या बाबतीत, एइओ कार्यक्रम चमूकडे 15 दिवसांच्या आत, अर्ज सोपविण्यात येतो. पुढील कारवाईची कालमर्यादा ही, एइओ टी-2 व एलओ प्रमाणने यांसाठी वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे सारखीच असतील.

**प्रश्न 58. सीमाशुल्काशी संबंधित असलेल्या कारवाईत सहभागी असलेल्या अर्जदाराच्या सर्व जागांना एइओ चमूद्वारे प्रत्यक्ष पडताळणीसाठी भेट द्यावयाची आहे किंवा कसे?**

**उत्तर -** एइओ टी-2 व एइओ एलओ प्रमाणनासाठी, एइओ परिपत्रकाच्या कलम 3 अन्वये निर्धारित केलेल्या निकषाची तपासणी, ज्या जागा एइओ टी-2 किंवा एइओ एलओ दर्जासाठी अर्जदाराच्या सीमाशुल्काशी संबंधित असलेल्या कारवाईशी ज्या संबंधित

असतील अशा सर्व जागांसाठी करण्यात येईल.

अभिलेख ठेवणे व सुरक्षा, इत्यादीच्या प्रमाण यंत्रणेद्वारे अर्जदाराच्या एकापेक्षा अधिक जागा तत्समरीतीने चालविण्यात येत असतील तर अशाबाबतीत, एइओ कार्यक्रम चमू एइओ परिपत्रकाच्या परिच्छेद 4.4.5.5 मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींनुसार अशा तत्समरीतीने चालविण्यात येत असलेल्या जागांपैकी कोणत्याही एका जागेस भेट देण्याची निवड करू शकतो. अशा परिस्थितीत, अर्जदाराने हमीपत्राच्या स्वरूपात तशा आशयाचे घोषणापत्र करावयाचे आहे. तथापि, जरी अर्जदार कारवाईच्या पल्ल्यात असेल किंवा कार्यचालनाच्या वेगवेगळ्या पद्धतीचा वापर करून वेगवेगळ्या जागा चालविण्यात येत असेल तर, एइओ कार्यक्रम चमूने त्या जागांना भेट द्यावयाची आहे.

**प्रश्न 59. अर्जदाराच्या जागेची प्रत्यक्ष पडताळणी करताना एइओ कार्यक्रम चमूद्वारे कोणत्या क्षेत्रांचा समावेश केला जातो?**

**उत्तर -** एइओ परिपत्रकाच्या कलम 3 मध्ये सूचीबद्ध केल्याप्रमाणे शर्ती व निकषांची पूर्तता यांसंबंधी अर्जात केलेले दावे अस्तित्वात आहे किंवा योग्य ठिकाणी आहे किंवा कसे याची तपासणी करणे हे एइओ चमूकडून प्रत्यक्ष पडताळणी करण्याचे प्रयोजन आहे.

भेटी देताना एइओ कार्यक्रम चमू पुढील क्षेत्राचा समावेश करील.

(एक) सीमाशुल्क अधिनियमाच्या उल्लंघनासह सीमाशुल्क प्रकरणाबाबतची माहिती.

(दोन) कोणत्याही असल्यास, मागील सीमाशुल्क दोषांवर केलेली सुधारात्मक कारवाई.

(तीन) लेखांकन व मालवाहतूक यंत्रणा

(चार) अंतर्गत नियंत्रणे व कार्यपद्धती

(पाच) मालवाहतुकीचा ओघ

(सहा) सीमाशुल्क गृह प्रतिनिधींचा वापर आणि इतर व्यावसायिक भागीदारांची निवड

(सात) संगणक/ माहिती तंत्रज्ञान व दस्तऐवज यांची सुरक्षा

(आठ) वितीय ऐपतदारी

(नऊ) सुरक्षा व सुरक्षितता निर्धारण- जागा, मालवाहतूक, कर्मचारीवर्ग, इत्यादी

(दहा) मालवाहतूक (लॉजिस्टिक) प्रक्रिया

(अकरा) मालाची साठवण

वरील यादी परिपूर्ण नाही. आवश्यकतेनुसार भेटीच्या कालावधीत चमू अधिकाधिक क्षेत्रांचा समावेश करण्याचा निर्णय घेऊ शकतो.

**प्रश्न 60. जर एइओ टी-2 किंवा एइओ एलओकरिता अर्जदार चमूला विवक्षित दस्तऐवज देण्यात कसूर करीत असेल किंवा यंत्रणेत/ प्रक्रियेत/ आवश्यक बाबींमध्ये समस्या असेल तर, प्रत्यक्ष पडताळणी थांबविता येऊ शकते का?**

**उत्तर -** होय, अपवादात्मक परिस्थितीमध्ये, परस्पर संमतीने पडताळणी प्रक्रिया थांबविता येऊ शकते. अतिरिक्त दस्तऐवज सादर करण्यास व किरकोळ समस्या दुरूस्ती करण्यास अर्जदारास वेळ देण्यात येतो. अर्जदाराने, दुरूस्तीसंबंधी माहिती 6 महिन्यांच्या आत एइओ चमूला कळवावयाची आहे, जेणेकरून पडताळणी प्रक्रिया पुन्हा सुरू करता येईल. अशाप्रकारे एइओ चमूने कळवावयाच्या सुधारित दिनांकास, अर्जावरील निर्णय अर्जदाराला मिळेल.

**प्रश्न 61. सीमाशुल्कासंबंधीचे दोष आणि त्याचे अनुपालन करण्यासंबंधी एइओ दर्जा धारकाने कोणास कळवावे?**

**उत्तर -** एइओ दर्जा धारकाने सीमाशुल्कासंबंधीचे दोष आणि त्याचे अनुपालन यासंबंधी अधिकारक्षेत्रीय मुख्य आयुक्ताच्या सीआरएमला तसेच एइओ कक्षाला कळवावे.

**प्रश्न 62. एइओ दर्जाचे नुतनीकरण कसे करता येईल?**

**उत्तर -** खाली नमूद केल्याप्रमाणे एइओ दर्जाची वैधता समाप्त (व्यपगत) होण्यापूर्वी त्यासाठी केलेल्या अर्जानुसार एइओ दर्जाचे नूतनीकरण केले जाते :-

| **एइओ दर्जा** | वैधता समाप्त (व्यपगत) होण्यापूर्वी नुतनीकरणासाठी अर्ज |
|---|---|

| | सादर करण्याची कालमर्यादा |
|---|---|
| एइओ- टी 1 | 30 दिवस |
| एइओ- टी 2 | 60 दिवस |
| एइओ- टी 3 | 90 दिवस |
| एइओ- एलओ | 90 दिवस |

अर्जदाराने त्याच्या नूतीनकरण अर्जामध्ये, मागील अर्जापासून केलेले बदल ठळकपणे दर्शविले पाहिजेत. एइओ कार्यक्रम व्यवस्थापक, नवीन दर्जा देतेवेळी अवलंबलेल्या प्रक्रियेचे अनुसरण करून, नूतीनकरण अर्जाचा विचार करील.

**प्रश्न 63. कोणत्या परिस्थितीत, एइओ दर्जा धारकाने त्याचा व्यवसाय व कार्यपद्धती यांमधील बदलाविषयी अधिसूचित करण्याची गरज आहे?**

**उत्तर -** एइओ दर्जा धारकाने बदलांच्या पुढील प्रकरणी अधिकारक्षेत्रीय मुख्य आयुक्ताच्या एइओकडे कक्षा किंवा ग्राहक संपर्क व्यवस्थापकाकडे अधिसूचित केले पाहिजे:-

अ) त्याच्या कायदेशीर संस्थेतील बदल.

ब) व्यवसाचे नाव आणि/ किंवा पत्ता यांतील बदल.

क) व्यवसायाच्या स्वरूपातील म्हणजेच निर्माणक/ निर्यातकार इत्यादींमधील बदल.

ड) लेखांकन व संगणक यंत्रणेतील बदल.

इ) सीमाशुल्क प्रकरणांसाठी जबाबदार असलेले वरिष्ठ कर्मचारी यांमधील बदल.

फ) आंतरराष्ट्रीय पुरवठा साखळीमध्ये सहभागी असलेली स्थाने किंवा शाखा वाढविणे

किंवा वगळणे.

**प्रश्न 64. एइओ दर्जा धारकाने, व्यवसाय प्रक्रिया यांमधील महत्वूपर्ण बदल अधिसूचित करण्याची कालमर्यादा काय आहे?**

**उत्तर -** एइओ दर्जा धारकाने बदल केल्याबरोबर शक्य तितक्या लवकर किंवा बदल घडून

आल्याच्या दिनांकापासून किमान 14 दिवसांच्या आत अधिसूचित केले पाहिजे.

**प्रश्न 65. संस्थेच्या वैधानिक दर्जामध्ये बदल झाल्यास एइओच्या अधिस्वीकृतीबाबत काय घडेल?**

**उत्तर -** एइओ दर्जा धारकाने नवीन कायदेशीर संस्थेच्या नावाने एइओ प्रमाणन करण्यासाठी पुन्हा अर्ज करणे गरजेचे आहे. उदाहरणार्थ जर एखादी कायदेशीर संस्था, भागीदारी संस्थेतून एलएलपीमध्ये किंवा प्रायव्हेट लिमिटेड कंपनीमध्ये रूपांतरित झाली तर, तिने नव्याने अर्ज करावयाचा आहे.

**प्रश्न 66. एइओ दर्जा पुनर्विलोकनाच्या अधीन आहे किंवा कसे?**

**उत्तर -** होय, एइओ ग्राहक, एइओ अधिस्वीकृतीच्या शर्तीचे नियमितपणे अनुपालन करीत असल्याची सुनिश्चिती करण्याकरिता, एइओ चमूने नियत कालांतराने एइओ दर्जाचे पुनर्विलोकन करणे अनिवार्य आहे.

**प्रश्न 67. एइओ दर्जाचे पुनर्विलोकन करण्याची कालमर्यादा काय आहे?**

**उत्तर -** एइओ दर्जाचे पुनर्विलोकन करण्याची वारंवारता एइओ टी-1 व एइओ टी-2 सारखीच आहे, म्हणजेच तीन वर्षातून एकदा पुनर्विलोकन केले पाहिजे. एइओ टी-3/ एलओ दर्जासाठी ती पाच वर्षे इतकी आहे.

तथापि, भारतातील एइओ कार्यक्रमाची अंमलबजावणी व संनियंत्रण करण्याची जबाबदारी सोपविलेले आंतरराष्ट्रीय सीमाशुल्क संचालनालय एइओ कार्यक्रमाच्या शर्तीशी किंवा एइओ दर्जाच्या मानकांशी तडजोड करण्यात आली आहे असे समजण्यास कारण असेल तर, कोणत्याही वेळी पुनर्विलोकन सुरू करू शकते.

## काढून घेणे / निलंबन / पुन:स्थापन

**प्रश्न 68. कोणत्या परिस्थितीत, एइओचा दर्जा निलंबित किंवा अवनत केला जाऊ शकतो ?**

**उत्तर -** एइओ कार्यक्रम व्यवस्थापकास, पुढील प्रकरणी, एइओच्या दर्जाचे प्रमाणपत्र निलंबित करता येईल:

अ) जेव्हा एइओच्या दर्जाच्या प्रमाणपत्राच्या शर्तीचे किंवा निकषांचे

कोणतेही अनुपालन केले नसल्याचे उघडकीस आले असेल तेव्हा; किंवा

ब) परिरक्षक किंवा सीमाशुल्क दलाल(ब्रोकर) किंवा गोदाम कार्यचालक यांच्या बाबतीत, जेव्हा परिरक्षक किंवा सीमाशुल्क दलाल (ब्रोकर) किंवा यथास्थिति, गोदाम कार्यचालक म्हणून असलेले मूळ लायसन, सक्षम प्राधिकाऱ्याद्वारे ते निलंबित करण्यात आलेले असेल तेव्हा.

सीमाशुल्क / केंद्रीय उत्पादन शुल्क / वस्तू व सेवा कर कायदा यांचे उल्लंघन केल्याबद्दल किंवा कोणतीही कारणे दाखवा नोटीस ( एइओ परिपत्रकाच्या 3.2.1 मध्ये सूचीबद्ध केलेल्या विषयाव्यतिरिक्त ) काढल्याच्याबाबतीत, एइओ टी-3 च्या दर्जावरून एइओ टी-2 किंवा एइओ टी-1 दर्जावर अवनत करण्यासाठी किंवा एइओ टी-2 चा दर्जा एइओ टी-1 वर पदावनत करण्यासाठी अथवा यथोचित वाटेल त्याप्रमाणे,एइओ दर्जा निलंबनासाठी देखील तरतूद आहे.

वरील निर्णय, कारणे दाखव नोटीसीच्या परिक्षणानंतर, अधिकारक्षेत्रीय आयुक्तांशी विचारविनिमय करून घेतला जातो.

**प्रश्न 69. एइओ दर्जा निलंबित किंवा अवनत करणाऱ्या एइओ कार्यक्रम व्यवस्थापकाच्या निर्णयाविरुध्द अपील दाखल करता येईल का ?**

**उत्तर -** नाही. एइओ योजनेखाली अपिलासाठी तरतुदी नाहीत. तथापि, निलंबित केलेला / अवनत केलेला एइओ दर्जा पुन:स्थापित करण्याची तरतूद आहे.

**प्रश्न 70. निलंबित केलेला/अवनत केलेला एइओ दर्जा पुन:स्थापित करण्याच्या शर्ती काय आहेत?**

**उत्तर -** वेगवेगळ्या परिस्थितीमधील शर्ती खालीलप्रमाणे आहेत :

अ) एइओ दर्जाच्या शर्तींचे अनुपालन न केल्याच्याबाबतीत, जर एइओ दर्जाधारक

निलंबनापासून 60 दिवसांच्या आत एइओ कार्यक्रम व्यवस्थापकाची खात्री पटण्यासाठी सुधारात्मक उपाययोजना हाती घेत असेल तर, एइओ कार्यक्रम व्यवस्थापकास एइओ दर्जा पुन:स्थापित करता येईल.

ब) सीमाशुल्क अधिनियमाखालील, कारणे दाखवा नोटीस देणे, सीमाशुल्क दलालाचे (ब्रोकर) लायसन रद्द करणे, इत्यादींसारख्या कार्यवाहीमुळे निलंबन केलेले असल्यास त्याबाबतीत,जर सीमाशुल्क अधिनियमाखालील कारवाई थांबविली असेल / लायसनचे निलंबन रद्द केले असेल तर, एइओ कार्यक्रम व्यवस्थापक एइओ दर्जा पुन:स्थापित करण्याचा विचार करू शकेल.

क) कारणे दाखवा नोटीसमुळे एइओ दर्जा निलंबित करण्यात / अवनत करण्यात आला असेल तर त्याबाबतीत, आणि जर सीमाशुल्क अधिनियमाअन्वये कारणे दाखवा नोटीशीमध्ये मागणी केलेल्या विवादित शुल्काचे अथवा मागणी केलेल्या किंवा नाकारण्याचा प्रयत्न केलेल्या शुल्काच्या अंशत: परताव्याचे (ड्रॉ बॅक) मागील तीन वर्षांतील प्रमाण हे एकूण प्रदान केलेल्या शुल्काच्या व मागणी केलेल्या करप्रतिग्रहाच्या दहा टक्क्यांहून अधिक नसेल तर, एइओ कार्यक्रम व्यवस्थापक, एइओ दर्जा पुन:स्थापित करण्याचा विचार करू शकेल.

ड) एइओ दर्जा अवनत करण्यात आला असेल त्याबाबतीत, संस्था, जेव्हा केव्हा पात्रता शर्तींची व निकषांची पूर्तता करते तेव्हा उच्च दर्जासाठी पुन्हा अर्ज करू शकेल. असे अर्ज, नवीन अर्ज म्हणून समजण्यात येतील.

**प्रश्न 71. कोणत्या परिस्थितीत एईओ दर्जा रद्द होऊ शकतो** ?

**उत्तर -** पुढील परिस्थितीमध्ये एइओ दर्जाचे प्रमाणपत्र रद्द करण्यात येईल :

अ) जेव्हा एइओ दर्जाचे प्रमाणपत्र, आधीच निलंबित केले जाते आणि निलंबन मागे घेण्यासाठी 60 दिवसांच्या आत सुधारात्मक उपाययोजना हाती घेण्यात एइओ धारक कसूर करतो तेव्हा; किंवा

ब) जेव्हा जे कृत्य सीमशुल्क अधिनियम,1962 अन्वये खटला भरण्यास पात्र आहे असे गुन्हेगारी कृत्य करण्यात आले असल्याचा आणि /किंवा

व्यक्तीच्या अटकेशी संलग्न असल्याचा वाजवी विश्वास असेल तेव्हा; किंवा

क) लबाडी,बनावटीकरण, उघड तस्करी, करपात्र वस्तूंची गुप्तपणे पाठवणी किंवा ग्राहकांकडून सेवा कर गोळा करण्यात आला आहे परंतु, शासनाला जमा केलेला नाही अशी प्रकरणे यांमध्ये सहभाग असल्याबद्दल त्यांना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे; किंवा

ड) जेव्हा एइओ दर्जा धारकाने अधिकृतता रद्द करण्याची विनंती केली असेल तेव्हा.

**प्रश्न 72. एईओ दर्जा रद्द केल्यानंतर एइओ दर्जासाठी एइओ दर्जा धारक पुन्हा अर्ज करु शकतो का ?**

**उत्तर -** एईओ टी-1 व टी-2 दर्जा धारकच केवळ दर्जा रद्द केल्याच्या दिनांकापासून एक वर्षांच्या कालावधीनंतर पुन्हा अर्ज करू शकतात.

एईओ टी-3 व एलओ दर्जा धारकच केवळ दर्जा रद्द केल्याच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या कालावधीनंतर पुन्हा अर्ज करू शकतात.

## तक्रार (गाऱ्हाणे) निवारण :

**प्रश्न 73. एइओ दर्जा धारकांचे लाभ व सुविधा यांच्याशी संबंधित असणारे कायदेशीर हितसंबंध व समस्या सीमाशुल्क प्रशासनाद्वारे कशा सोडविल्या जातात ?**

**उत्तर -** एइओ परिपत्रकामध्ये सूचीबद्ध केलेल्या एइओ दर्जा धारकांना सर्व लाभ व सुविधाकारी उपाययोजना देण्यास सीमाशुल्क प्रशासन बांधील आहे. प्रत्येक मुख्य सीमाशुल्क आयुक्तांच्या कार्यालयात एइओ दर्जा धारकांशी सुसंवाद साधण्याचे एक केंद्र म्हणून सहायक आयुक्ताच्या/उप आयुक्ताच्या (एसी/ डीसी) स्तरावर ग्राहक संपर्क व्यवस्थापकाची (सीआरएम) नियुक्ती करण्यासाठीची तरतूद आहे. ग्राहक संपर्क व्यवस्थापकाची नियुक्ती, सर्व अधिकारक्षेत्रीय सीमाशुल्क केंद्राद्वारे

सार्वजनिक नोटिशीच्या स्वरुपात अधिसूचित केली जाते. ग्राहक संपर्क व्यवस्थापकाकडे एइओ ग्राहकांचे कायदेशीर हितसंबंध व समस्या हाताळण्याची जबाबदारी सोपण्यात येते. ग्राहक संपर्क व्यवस्थापकाचा तपशील, सीबीआयसीच्या संकेतस्थळावर ऑनलाईन देखील दिलेला आहे.

**प्रश्न 74. ग्राहक संपर्क व्यवस्थापकाच्या इतर कोणत्या जबाबदाऱ्या आहेत ?**

**उत्तर -** सर्व अधिकारक्षेत्रीय ग्राहक संपर्क व्यवस्थापक(सीआरएम) पुढील गोष्टींसाठी जबाबदार असेल:

अ) एइओ परिपत्रकात सूचीबद्ध केलेल्या सुविधा व लाभ एइओ दर्जा धारकांना देणे,

ब) एइओ अर्ज दाखल करताना सहाय्य करणे.

क) सीमाशुल्का अंतर्गत असलेले वेगवेगळे विभाग तसेच इतर हितसंबंधित यांच्यासोबत समन्वय साधून सोडविलेल्या प्रक्रियात्मक व कार्यचालनात्मक समस्या मिळवताना सहाय्य करणे.

**प्रश्न 75. एइओ मदत कक्ष आहे का ?**

**उत्तर -** मुख्य सीमाशुल्क आयुक्तांच्या संबंधात नोडल अधिकाऱ्याच्या नेतृत्वाखालील एइओ चमू एइओ अर्ज दाखल करण्याशी संबंधित असलेल्या सर्व चौकशींसाठी मदत कक्ष म्हणून काम करतो. नोडल अधिकाऱ्यांचे व ग्राहक संपर्क व्यवस्थापकाचे संपर्क क्रमांक संकेतस्थळावर उपलब्ध आहेत. एइओ टी-1 अर्ज ऑनलाईन दाखल करण्याच्या संबंधातील कोणत्याही चौकशीसाठी, पुढील तपशील असलेला एक स्वतंत्र मदत कक्ष तयार करण्यात आलेला आहे : दूरध्वनी क्रमांक -011-23310013 इ-मेल : diccbec.dor@gov.in

<u>**जोडपत्र - अ**</u>

<u>**प्राधिकृत आर्थिक कार्यचालक (एईओ) टी-1 अर्ज ऑनलाईन दाखल करताना वारंवार विचारले जाणारे प्रश्न.**</u>

**प्रश्न 1. एईओ अर्ज ऑनलाईन दाखल करता येऊ शकतात का?**

**उत्तर -** होय, एइओ अर्ज दाखल करण्यासाठी आणि प्रक्रिया करण्यासाठी एक ऑनलाईन संकेतस्थळ (वेबसाईट) (डोमेन नाव : aeoidia.gov.in) निर्माण करण्यात आले आहे. सीबीआयसी परिपत्रक क्रमांक 51/2018 सीमाशुल्क, दिनांक 7.12.2018 द्वारे एइओ अर्ज दाखल करण्यासाठी ऑनलाईन सुविधा सुरू केली होती. एइओ टी-2, एइओ टी-3 व एइओ एलओ यांसारख्या उर्वरित तीन प्रकारच्या एइओ अधिस्वीकृतीसाठी अर्ज दाखल करणे व त्यावर प्रक्रिया करणे ही कामे आतापर्यंत

हाताने केली जात होती.

**प्रश्न 2.** **ऑनलाईन एईओ टी-1 अर्ज दाखल करण्यासाठी तपशीलवार मार्गदर्शक तत्त्वे कोठे मिळू शकतील ?**

**उत्तर -** एइओ टी-1 अर्ज ऑनलाईन दाखल करण्याबाबतचे सीबीआयसी परिपत्रक क्रमांक 51/2018 सीमाशुल्क, दिनांक 7.12.2018 हे www.cbic.gov.in या संकेतस्थळावर (वेबसाईट) उपलब्ध आहे. फील्ड फॉर्मेशन्सने एइओ टी-1 दर्जासाठी संकेतस्थळ आधारित ऑनलाईन अर्जावरून सार्वजनिक सूचना जारी केल्या आहेत. उदाहरणार्थ, जवाहरलाल नेहरू कस्टम हाऊस, मुंबई यांनी ऑनलाईन एइओ संकेतस्थळाच्या संबंधित वेब पृष्ठाच्या स्क्रिनशॉटसह एइओ टी-1 दाखल करण्याची प्रक्रिया तपशीलवार स्पष्ट करणारी जाहीर नोटीस क्रमांक 158/2018, दिनांक 21.12.2018 काढली आहे. वरील जाहीर सूचना जवाहरलाल नेहरू सीमाशुल्क हाऊस (जेएनसीएच), मुंबई यांच्या http://www.jawaharcustoms.gov.in/ या संकेतस्थळावर (वेबसाईट) सार्वजनिक सूचना टॅबखाली उपलब्ध आहे.

**प्रश्न 3.** **एईओ टी-1 दर्जासाठी ऑनलाईन अर्ज दाखल करण्याची पहिली पायरी कोणती? त्याचे महत्त्व काय आहे?**

**उत्तर -** अर्जदाराने प्रथम, नोंदणी खिडकीमध्ये (विंडोमध्ये) विचारलेली माहिती सादर करून www.aeoidia.gov.in या एइओ वेबसाईटवर स्वत:ची नोंदणी करावयाची आहे आणि एइओ टी-1 अर्ज ऑनलाईन दाखल करण्यासाठी वेबसाईटवर लॉगइन करण्यासाठी वापरकर्ता आयडी किंवा पासवर्ड तयार करावयाचा आहे.

ऑनलाईन एइओ टी-1 अर्जावर प्रक्रिया करण्यापूर्वी सीमाशुल्क अिधकाऱ्याकडून अर्जदाराच्या आयात-निर्यात संकेतांकामधील (आईसी) तपशिलावरून नोंदणी तपशिलाची पडताळणी केली जाते. जर दाखल केलेले नोंदणी तपशील पडताळणी योग्य नसतील, तर ऑनलाईन अर्जावर प्रक्रिया केली जात नाही. म्हणून, नोंदणी करताना आयइसीनुसार अचूक तपशील दाखल करणे महत्त्वाचे आहे.

**प्रश्न 4.** **ऑनलाईन एईओ टी-1 अर्ज दाखल करण्यासाठी नोंदणी करताना अर्जदाराने "प्रक्षेत्र"**

**दाखल करताना कशाची निवड करावयाची आहे?**

**उत्तर -** आयात किंवा निर्यात करण्यासाठी ते जे प्रक्षेत्र वापरत असतील त्या सीमाशुल्क प्रक्षेत्राची निवड करण्याचा सल्ला अर्जदाराला देण्यात येत आहे. जर ते एकापेक्षा अधिक सीमाशुल्क प्रक्षेत्राचा वापर करत असतील तर, ज्या प्रक्षेत्रामध्ये आयात/ निर्यात कार्याची संख्या जास्त असेल ते प्रक्षेत्र निवडण्यात यावे.

**प्रश्न 5. ऑनलाईन एईओ टी-1 अर्ज दाखल करण्यासाठी नोंदणी करताना अर्जदाराने कोणता भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक व ई-मेल पत्ता द्यावा?**

**उत्तर -** जो डीजीएफटीकडे नोंदणीकृत केलेला आहे आणि जो आयईसी प्रमाणपत्राशी जुळतो तोच भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक/ ई-मेल पत्ता सादर करावा. जर सध्याचा भ्रमणध्वनी (मोबाईल) क्रमांक व ई-मेल पत्ता बदलला असेल तर दिलेल्या आयात-निर्यात संकेतांक (आईसी) प्रमाणपत्रात दिलेल्या डीजीएफटीमध्ये तोदेखील अद्ययावत करावा.

**प्रश्न 6. ऑनलाईन एईओ अर्जासह अपलोड करावयाचे अनिवार्य दस्तऐवज कोणते आहेत?**

**उत्तर -** ऑनलाईन एईओ अर्जामध्ये अनुक्रमे क्रमवार भरावयाची माहिती/ घोषणापत्रे असलेली दोन जोडपत्रे आहेत. अपलोड करावयाच्या दस्तऐवजांबद्दल अर्जदारास मार्गदर्शन करण्यासाठी मदत चिन्हांसह (माहिती बटण “आय”) अपलोड पर्याय दोन जोडपत्रांमधील काही चौकस मुद्दे तयार केले आहेत. प्रक्रियेसाठी अर्ज पूर्ण करण्यासाठी अशा सर्व चौकस मुद्यांच्या/अनुक्रमांच्या समोरील अर्जदाराने दस्तऐवज/ पुरावे अपलोड करावयाचे आहेत.

**प्रश्न 7. ऑनलाईन अर्जाच्या जोडपत्र-1 अनुक्रमांक 4 येथे अपलोड करावयाची स्थळे/ पत्ते यांचा स्थळ नकाशा काय आहे?**

**उत्तर -** अर्जदाराने डीजीएफटीने दिलेल्या आयात-निर्यात संकेतांक (आईसी) प्रमाणपत्रात नमूद केलेल्या नोंदणीकृत कार्यालयाचा आणि शाखांचे पत्ते यांचा स्थळ नकाशा (साईट प्लॅन) अपलोड करावयाचा आहे. स्थळांचे गुगल नकाशे (मॅप) स्थळ नकाशे (साईट प्लॅन) म्हणून अपलोड करू नये.

**प्रश्न 8. निव्वळ मूल्य व निव्वळ चालू मत्ता यांच्या पुष्ट्यर्थ ऑनलाईन अर्जाच्या जोडपत्र अ-2 अनुक्रमांक 8 व 9 येथे कोणते दस्तऐवज जोडणे आवश्यक आहे?**

**उत्तर -** अर्जदाराने, मागील तीन वित्तीय वर्षांचा लेखापरिक्षित ताळेबंदातील निव्वळ मूल्य व निव्वळ चालू मत्ता यांच्याशी संबंधित असलेली पृष्ठे अपलोड करावयाची आहेत. अपलोड केलेले पृष्ठ, सांविधिक लेखापरिक्षक किंवा सनदी लेखापाल यांच्याकडून सत्यापित/ अधिप्रमाणित करावे.

**प्रश्न 9. जेव्हा अर्जदारास त्याच्या ऑनलाईन अर्जामध्ये उणिवा असल्याबाबत ईमेल प्राप्त होतो तेव्हा त्याने काय करावे?**

**उत्तर -** एइओ चमूने दाखवून दिलेल्या उणिवा दूर केल्यानंतर आणि उणिवेमध्ये सूचीबद्ध केलेले दस्तऐवज अपलोड केल्यानंतर, अर्जदार पुन्हा ऑनलाईन अर्ज दाखल करू शकतो. असा अर्ज, संबंधित प्रक्षेत्राचा एइओ नोडल अधिकाऱ्याकडे पुन्हा प्रक्रिया करण्यासाठी येईल.

**प्रश्न 10. ऑनलाईन अर्जाच्या संभाव्य अर्जदारांच्या प्रश्नांची उत्तरे देण्यासाठी कोणतेही मदत केंद्र आहे का?**

**उत्तर -** होय. ऑनलाईन एईओ टी-1 अर्ज भरण्याशी संबंधित असणाऱ्या कोणत्याही प्रश्नासाठी स्वतंत्र मदत केंद्र असून त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

दूरध्वनी क्रमांक 011-23310013, ईमेल :- diccbec.dor@gov.in

याशिवाय, अर्जदार, एइओच्या नोडल अधिकाऱ्यास किंवा सीमाशुल्क विभागाच्या प्रक्षेत्रीय मुख्य आयुक्त यांच्या संबंधित कार्यालयाच्या ग्राहक संपर्क व्यवस्थापकाशी संपर्क साधू शकतो. वरील अधिकाऱ्यांचा तपशिल, सीआयसीच्या www.cbicgov.in या संकेतस्थळावर किंवा संबंधित प्रक्षेत्राच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. उदाहरणार्थ, मुंबई प्रक्षेत्र-2 च्या सीआरएमचा तपाशिल, www.jawaharcustoms.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# संक्षेप सूची

| | | | |
|---|---|---|---|
| 1. | AEO | Authorised Economic Operator | प्राधिकृत आर्थिक कार्यचालक |
| 2. | WCO | World Customs Organization | जागतिक सीमाशुल्क संघटना |
| 3. | ACP | Accredited Client Programme | अधिस्वीकृत ग्राहक कार्यक्रम |
| 4. | TFA | Trade Facilitation Agreement | व्यापार सुलभीकरण करार |
| 5. | SCN | Show Cause Notice | कारणे दाखवा नोटीस |
| 6. | GAAP | Generally Accepted Accounting Principles | सर्वसाधारणपणे स्वीकृत लेखांकन तत्त्वे |
| 7. | SOPs | Standard Operating Procedures | प्रमाण कार्यचालन कार्यपद्धती |
| 8. | ROC | Registrar of Companies | कंपनी निबंधक |
| 9. | CRM | Client Relationship Manager | ग्राहक संपर्क व्यवस्थापक |
| 10. | IEC | Import-Export Code | आयात-निर्यात संकेतांक |
| 11. | LO | Logistic Operator | मालवाहतूक कार्यचालक |

## Bullet Points

| | | |
|---|---|---|
| p.no.5 | The aim of AEO programme is to secure the international supply chain by granting recognition to reliable operators and encouranging best practices at all levels in the international supply chain. | विश्वसनीय कार्यचालकांना मान्यता देऊन त्याद्वारे आंतरराष्ट्रीय पुरवठा साखळी सुरक्षित करणे आणि आंतरराष्ट्रीय पुरवठा साखळीतील सर्व स्तरांवर सर्वोत्तम पद्धतीस उत्तेजन देणे हे प्राधिकृत आर्थिक कार्यचालक कार्यक्रमाचे ध्येय आहे. |
| 6 | Applying for AEO status is a business decision depending on the roll of the business entity in the supply chain and it's willingness to acquire the benefit following by acquiring AEO status. | प्राधिकृत आर्थिक कार्यचालक दर्जा मिळण्याकरिता अर्ज करणे हा एक व्यावसायिक निर्णय आहे, आणि प्राधिकृत आर्थिक कार्यचालक दर्जा संपादन करून घेतल्यावर तुमच्या व्यापाराच्या परिस्थितीवर, पुरवठा साखळीतील तुमच्या भूमिकेवर आणि तुमच्या व्यवसायासाठी जे लाभ यामुळे मिळू शकतात यावर तो अवलंबून आहे. |

| | | |
|---|---|---|
| 9 | Indian Customs has signed Mutual Recognition Agreement (MRA) with South Korea, Taiwan and Hong Kong Customs to to enable trade to get benefits on reciprocal basis. | व्यापारात परस्पर तत्वावर लाभ मिळणे शक्य व्हावे यासाठी संबंधित एइओ कार्यक्रमांना मान्यता देण्याकरिता भारतीय सीमाशुल्क विभागाने दक्षिण कोरिया, तैवान व हाँगकाँग यांच्याशी सीमाशुल्क परस्पर मान्यता करार (एमआरए) स्वाक्षरित केला आहे. |
| 14 | *The Legal requirement for applying for AEO status, as prescribed in para 3.2 and annexure E.2, to Circular No. 33/2016-Customs dated 22.7.2016.* | एइओ दर्जासाठी अर्ज करण्याच्या कायदेशीर शर्ती परिपत्रक क्र.33/2016-सीमाशुल्क यातील परिच्छेद-3.2 आणि जोडपत्र इ-2 मध्ये विहित केल्याप्रमाणे आहेत. |
| 17 | *In Annexure F, the applicant has to give details of all his business partner(s) in International Supply chain which includes their accreditation under Indian AEO Programme.* | जोडपत्र फ मध्ये अर्जदाराने ज्या आंतरराष्ट्रीय पुरवठा साखळीतील त्याच्या सर्व व्यावसायिक भागीदाराचा (भागीदारांचा) तपशील द्यावयाचा असून त्यात भारतीय एइओ कार्यक्रमांतर्गत त्यांच्या अधिस्वीकृतीचा समावेश आहे. |
| 20 | *In case of AEO T-3 application by an AEO T-2 status holder, the application isassigned to AEO programme team within 15 days.* | एइओ टी-2 दर्जाधारकाच्या एइओ टी-3 अर्जाच्या बाबतीत, एइओ कार्यक्रम चमूकडे 15 दिवसांच्या आत, अर्ज सोपविण्यात येतो. |
| 22 | *The audited balance sheet by Auditor contains remark about the Accounting system adopted by applicant.* | लेखापरीक्षकाने लेखापरीक्षण केलेल्या ताळेबंदामध्ये अर्जदाराने स्वीकारलेल्या लेखांकन पद्धती बद्दलचा शेरा अंतर्भूत असेल. |

| | | |
|---|---|---|
| 25 | *there is* ***no*** *provision for appeal under the AEO scheme. However, there is provision of restoration of suspended/downgraded AEO status.* | एइओ योजनेखाली अपिलासाठी तरतुदी नाहीत. तथापि, निलंबित केलेला / अवनत केलेला एइओ दर्जा पुन:स्थापित करण्याची तरतूद आहे. |
| 28 | *For any query regarding online filing of AEO T-1 application, a separate help desk with following details has been created: Ph-011-23310013.* | एइओ टी-1 अर्ज ऑनलाईन दाखल करण्याच्या संबंधातील कोणत्याही चौकशीसाठी, पुढील तपशील असलेला |

| | | |
|---|---|---|
| | *E-mail: diccbec.dor@gov.in.* | एक स्वतंत्र मदत कक्ष तयार करण्यात आलेला आहे : दूरध्वनी क्रमांक -011-23310013 इ-मेल : diccbec.dor@gov.in |

Mrs. Aarti Veling, Supervisor, Mr. Arun Gite, Incharge Deputy Director of Languages and Mrs. Nanda Raut, Director of Languages, Directorate of Languages, Government of Maharashtra, 5th floor, New Administrative Building, Near Dr. Ambedkar Garden, Government Colony, Bandra (east), Mumbai-400 051.